मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २७८ | रविवार, २१ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# ‘श्री अंबाबाई मंदिर परिसर व कॉरिडॉर’ विकासासाठी १५०० कोटींचा निधी देणार – केंद्रीय मंत्री अमित शाह

**कोल्हापूर :** दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखले जाणारे करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर तब्बल १५०० कोटी रुपयांच्या निधीतून खर्च करून हा परिसर विकास कॉरीडॉर म्हणून विकसित करण्यात येणार आहे, ही बाब सर्व भाविकांसाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.



पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित कृतज्ञता सोहळा सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत (दादा) पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, नगर विकास राज्यमंत्री तथा कोल्हापूरच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी मंत्री रवींद्र चव्हाण खासदार सर्वश्री धनंजय महाडिक, धैर्यशील माने, आमदार सर्वश्री डॉ. विनय कोरे, डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर, अमल महाडिक, चंद्रदीप नरके, डॉ.अशोकराव माने, शिवाजी पाटील, निरंजन डावखरे, जिल्हा परिषद अध्यक्ष शिल्पा खोत,महापौर रुपाराणी निकम, माजी आमदार प्रकाश आवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. शाह म्हणाले, ७ व्या शतकातील असलेल्या या प्राचीन मंदिराच्या परिसरातील सुमारे ४१ छोट्या-मोठ्या मंदिराचे संरक्षण करून येथील परिसर पुढील ६ महिन्याच्या आत विकसित करण्यात येणार आहे. या ठिकाणी अन्नछत्र सुरू करण्याबाबत आपण सकारात्मक असल्याचे सांगितले. आपल्या वारशाचे, संस्कृतीचे जतन, संवर्धन करणे आणि त्याला



चालना देणारे हे शासन असल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारर्कीदीत आर्थिक, संरक्षण, सुरक्षा या सर्वच क्षेत्रात झालेल्या प्रगतीची मांडणी करताना देशातील घुसखोरांना अत्यंत बारकाईने शोधून काढण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ग्रामीण व शहरी भागातील विकास गतीने सुरू असल्याचेही श्री शाह म्हणाले.

**कोल्हापूर सहकाराची पंढरी – मुख्यमंत्री श्री. फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची अध्यात्मिक व सांस्कृतिक शक्ती पुनर्जीवित होत आहे. या परिसराचा विकास करण्याचा आग्रह केंद्रीय गृहमंत्र्यांनी आग्रह धरला होता.

राज्यातील ५ जोतिर्लिंगांसह कोल्हापूर जिल्ह्यातील जोतिबा तीर्थक्षेत्राचाही विकास सुरु आहे. भाविकांसाठी या आराखड्यातून पुढील शंभर वर्षात सेवा करता येईल, असे व्यापक काम राज्य शासनाने हाती घेतले आहे. कोल्हापूर शहर हे केवळ शक्तिपीठ अथवा अध्यात्माची पंढरी नाही तर ती सहकाराची आद्य पंढरी असल्याचे सांगितले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कणखर नेतृत्वात देशाची वेगळी ओळख निर्माण झाली असून त्यांनी सहकार क्षेत्रात अतुलनीय कार्य केल्याचे गौरोवोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले.

तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, येथील मंदिर परिसरातील आधुनिकीकरण व सुशोभीकरणाच्या कामाला आज प्रारंभ झाला आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूर एक वेगळ्या उंचीवर जाईल. महाराष्ट्राने संपूर्ण देशाला अध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात वेगळी ओळख दिली आहे.

अमित शाह हे अतिशय कणखर गृहमंत्री असून देशातील नक्षलवाद संपवण्याचे काम केंद्रीय गृहमंत्रालयाद्वारे पूर्ण झाले.

त्याचबरोबर सहकार क्षेत्रात अनेक लोकाभिमुख बदल श्री. शाह यांनी घडविले आहेत. पालकमंत्री श्री. अबिटकर म्हणाले, तीर्थक्षेत्र विकास आराखडा हा कोल्हापूरवासियांसाठी अत्यंत अभिमानाचा व आनंदाचा क्षण आहे.

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातर्गंत या ठिकाणी भाविकांना सुविधा निर्माण होतील. राज्यातील इतर सुविधांना ही केंद्र शासनाने गती देवून महाराष्ट्राचा विकास करावा अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली.

## पारवा पोलिसांची मध्यरात्री 'सिंघम' स्टाईलने मोठी कारवाई; ७ लाखांपेक्षा अधिकचा मुद्देमाल जप्त, गोवंशाची सुटका!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार हेमंत चौधरी यांच्या धडक आणि 'सिंघम' स्टाईल कार्यपद्धतीची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. रात्रीच्या घोर अंधारात मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ठाणेदार हेमंत चौधरी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह धडक मोहीम राबवून अवैध गोवंश वाहतूक आणि साठवणुकीवर मोठी कारवाई केली आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी तब्बल ७ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून अनेक निष्पाप जनावरांची कसाईखान्यात जाण्यापूर्वी सुरक्षित सुटका केली आहे.



घटनेची माहिती अशी की, १९ जूनच्या मध्यरात्री ठाणेदार हेमंत चौधरी यांना एका गोवंश तस्करीबाबत खात्रीशीर माहिती मिळाली होती. कोणतीही वेळ न गमावता ठाणेदार आणि त्यांच्या पथकाने चिखलवर्धा ग्राम परिसरात सापळा रचला. रात्री साडेअकराच्या सुमारास पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकली असता, एका पांढऱ्या रंगाच्या महिंद्रा पिकअप वाहनामध्ये (क्र. MH 23 AU 0167) अत्यंत निर्दयतेने आणि कोंबून भरलेले १० गोवंश आढळून आले. यात १५ महिने वयाचे पांढऱ्या आणि लाल रंगाचे गोऱ्हे होते.

पोलिसांनी केवळ वाहनाचीच नाही, तर आजूबाजूच्या परिसराची आणि दावणीची देखील कसून तपासणी केली. यावेळी पोलिसांना तिथे दोन पांढऱ्या रंगाचे बैल, चार गाई आणि अवघ्या ३ ते ६ महिन्यांची तीन लहान वासरे दोरीने अत्यंत क्रूरपणे बांधलेली आढळून आली. पोलिसांनी ५ लाख रुपये किमतीचे पिकअप वाहन आणि २ लाख ६१ हजार रुपये किमतीची एकूण १९ जनावरे असा एकूण ७ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त केला.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल स्वप्नील केशवराव सलाम यांच्या तक्रारीवरून पारवा पोलीस ठाण्यात आरोपी शेख शाकीर शेख कमु (वय २७, रा. कुर्ली) आणि शेख आदिल शेख रफिक (वय २०, रा. बाभुळगाव) यांना ताब्यात घेण्यात आले आहे, तर चिंचवर्धा येथील इरशाद करीमउल्ला खान हा मुख्य आरोपी सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याच्या कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुटका करण्यात आलेल्या सर्व गोवंशाची रवानगी तात्काळ चारा-पाणी आणि संगोपनासाठी 'कामधेनु गोरक्षण पाटापांगरा' येथे करण्यात आली आहे. भररात्री ठाणेदार हेमंत चौधरी यांनी दाखवलेल्या या 'सिंघम' बाण्यामुळे परिसरातील गोवंश तस्करांचे धाबे दणाणले असून, नागरिकांमधून पारवा पोलिसांच्या या कामगिरीचे मोठे कौतुक होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्यामसुंदर रायके आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल संदीप महाजन करत आहेत.

## पनवेल तालुका पोलिसांनी केली दंगा काबू योजनेची रंगीत तालीम



**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी** : पनवेल तालुका पोलिसांच्या माध्यमातून तालुक्यातील डेरवली गाव येथे दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

सदरच्या दंगा काबू योजनेच्या रंगीत तालीममध्ये पोलीस ठाणे कडील वपोनि गजानन घाडगे, पो.नि.कांबळे यांच्यासह 03 सपोनी/पोउपनि, 22 पोलीस अंमलदार पीटर मोबाईल, पीटर मोबाईल 3, तसेच उपजिल्हा रुग्णालय पनवेल कडील रुग्णवाहिका 01 डॉक्टर 02 स्टाफसह उपस्थित होते. तसेच सदरवेळी दंगा काबु योजनेतील सर्व अधिकारी व अंमलदार यांना कवायतीचे प्रशिक्षण देण्यात आले, तसेच सद्यस्थितीचे अनुषंगाने उपस्थितीत अधिकारी व अंमलदार यांना दंगली मध्ये घ्यावयाच्या दक्षतेबाबत आवश्यक त्या सूचना वपोनि गजानन घाडगे यांनी दिल्या.




## प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना देशाच्या युवा शक्तीला नवी दिशा देणारी योजना – आमदार प्रशांत ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही देशातील युवकांना रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य प्रदान करणारी महत्त्वपूर्ण योजना असल्याचे प्रतिपादन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे केले. पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ईपीएफओ वाशी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना लाभ वितरण कार्यक्रमात प्रमुख मान्यवर म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त डॉ. रामकृष्ण त्रिपाठी, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त मनोज माने, सहाय्यक भविष्य निर्वाह निधी आयुक्तएस. एच. संघानी, सहाय्यक भविष्य निर्वाह निधी आयुक्त सुश्री आकांक्षा पटेल, ईपीएफओ अधिकारी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, नियोक्ते, कर्मचारी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोजगारनिर्मिती, आर्थिक समृद्धी आणि सामाजिक सुरक्षा मजबूत करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजने अंतर्गत



कर्मचारी भविष्य निधी संघटना प्रोत्साहन वितरण समारंभ दिल्लीतील विज्ञान भवन येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पार पडला. या सोहळ्याचे थेट प्रक्षेपणही दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले होते. यावेळी या मार्गदर्शनाचा लाभ उपस्थितांनी घेतला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी केंद्र सरकार रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, उद्योजकता आणि सामाजिक सुरक्षा या क्षेत्रात अभूतपूर्व कार्य करत आहे. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही युवकांना औपचारिक रोजगाराशी जोडणारी आणि उद्योगांना नवीन रोजगारनिर्मितीसाठी प्रोत्साहन देणारी महत्त्वाची योजना आहे. ईपीएफओ वाशी क्षेत्रातील ११ हजार ८२७ प्रतिष्ठाने या योजनेच्या कक्षेत येतात. त्यापैकी ७ हजार ३९१ प्रतिष्ठानांनी या योजनेत नोंदणी केली असून १ लाख १४ हजार ८८० हून अधिक नव्या कर्मचाऱ्यांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. हा केवळ आकडा नसून हजारो कुटुंबांच्या जीवनात आशा, सन्मान आणि आर्थिक सुरक्षितता निर्माण करणारा टप्पा असल्याचे त्यांनी नमूद केले. देशभरातील लाभार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुमारे २४०० कोटी रुपयांचे प्रोत्साहन अनुदान थेट लाभ हस्तांतरणद्वारे वितरित करण्यात येत असल्याचे सांगून, ही रक्कम युवकांच्या उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नवी मुंबई आणि पनवेल परिसरात वेगाने होत असलेल्या विकासकामांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. विमानतळ, वाढती औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स आणि सेवा क्षेत्राचा विस्तार यामुळे हजारो युवकांना रोजगार मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींना अधिकाधिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले. तसेच युवकांनी कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या संधींचा स्वीकार करून विकसित भारताच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ईपीएफओ वाशी कार्यालय, श्रम व रोजगार मंत्रालय तसेच सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

# पनवेलच्या गोल्डन ग्रुपने जपली सामाजिक बांधिलकी

## राजीप शाळा रिटघर येथे केले शैक्षणिक साहित्य आणि छत्रीचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** "मैत्री हेच जीवन" हा संदेश समाजाला देत सामाजिक उपक्रमात सातत्याने अग्रस्थानी असणारी पनवेलची गोल्डन ग्रुप या संस्थेच्या वतीने शनिवार दिनांक २० जून रोजी शैक्षणिक साहित्य आणि छत्रीचे वाटप करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेच्या रिटघर येथील शाळेमध्ये गोल्डन ग्रुप सदस्यांनी सदर वाटप केले. या कार्यक्रमाला रिटघर ग्रामपंचायतचे सरपंच सुभाष पुंडलिक भोपी यांची प्रमुख उपस्थिती होती.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग भोपी यांनी गोल्डन ग्रुप पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत केले. गोल्डन ग्रुपचे अध्यक्ष वसंत भगत आणि आधारस्तंभ निळकंठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली हे वाटप संपन्न झाले. गोल्डन ग्रुपच्या वतीने रीटघर शाळेतील १६१ विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना बटन छत्रीचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वह्या पेन, पेन्सिल, खोडरबर,शार्पनर, पट्टी असे शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. सरपंच सुभाष भोपी यांनी गोल्डन ग्रुप करत असलेल्या समाजकार्याबद्दल आणि रिटघर राजिप शाळेत छत्री वाटप केल्याबद्दल या संस्थेची प्रशंसा केली तसेच आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

गोल्डन ग्रुपचे सदस्य मंदार दोंदे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मित्र आणि मैत्री जपण्याचा कानमंत्र दिला. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आई-वडील, शिक्षक आणि मित्र हे जपलेच पाहिजेत असेही



**दिलदार मित्रांच्या सजग संस्थेने यापूर्वी समाजातील अंतिम घटकाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी अनेक उत्तमोत्तम उपक्रम राबविले आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या गरजवंत शाळांना वर्ग उभारून देणे, रंगरंगोटी करून देणे, छप्पर बसून देणे, कपाटे भेट देणे अशा अनेक उपक्रमामुळे गोल्डन ग्रुप संस्था नावाजली गेली आहे.तसेच त्या संस्थेने विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप देखील केलेले आहे.**

ते म्हणाले.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अथक परिश्रम घेणारे अध्यक्ष वसंत भगत यांचा शिक्षक वृंदाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सरपंच सुभाष भोपी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पांडुरंग भोपी, निळकंठ भगत, वसंत भगत, पत्रकार विवेक पाटील, पत्रकार मंदार दोंदे, विजय पाटील, विजय पवार, अमोल गोवारी, संजय कोलकर, प्रसाद गायकवाड,किशोर थळे, विजय रेवसकर,श्रीमंत चिलवंत, श्रुती कोंडिलकर, कविता थळे, वैशाली पाटील, सुप्रिया नवले, देविदास भोपी यांची उपस्थिती होती.

# वर्ध्यात डान्स बार बंद होऊ शकतात, तर रायगडमध्ये का नाही?" योगेश चिले यांचा सवाल;

## मनसेच्या आमरण उपोषणाला जनतेचा वाढता पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :दिपक कोळवणकर** : पनवेल आणि नवी मुंबई परिसरात ऑर्केस्ट्राच्या नावाखाली सुरू असलेल्या लेडीज डान्स बारविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आता निर्णायक लढाई छेडली आहे. हे बार कायमस्वरूपी बंद व्हावेत, या मागणीसाठी मनसेच्या वतीने ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमरण उपोषण करण्यात येणार असून या आंदोलनाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी मनसेचे पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले यांनी प्रश्न उपस्थित केला की, "महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमामुळे ओळखल्या जाणाऱ्या वर्धा जिल्ह्यात डान्स बार बंद होऊ शकतात, तर छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी आणि पावन भूमी असलेल्या रायगड जिल्ह्यात ते बंद का होऊ शकत नाहीत?"

मनसेने या आंदोलनासाठी पुढील



एक महिन्याचा व्यापक जनजागृती कार्यक्रम आखला आहे. आमरण उपोषणापूर्वी महाराष्ट्र सैनिक पनवेल, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील विविध भागांमध्ये जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. रेल्वे स्थानके, बस स्थानके, बाजारपेठा, गृहनिर्माण संस्था, सामाजिक संस्था, मंडळे, व्यापारी संघटना तसेच डॉक्टर, वकील, शिक्षक, उद्योजक आणि विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना भेटून आंदोलनाची भूमिका समजावून सांगितली जाणार आहे.

यासाठी विशेष पत्रकांचे वाटप करण्यात येणार असून, प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचून या आंदोलनाला नैतिक व प्रत्यक्ष पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. "हा केवळ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा लढा नसून समाजहिताचा आणि पुढील पिढीच्या भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने या आंदोलनाच्या पाठीशी उभे राहावे," असे आवाहन मनसेच्या वतीने करण्यात आले आहे.

काही महिन्यांपूर्वी मनसेने डान्स बारविरोधात खळ्ळखट्याक आंदोलन केले होते. मात्र अपेक्षित परिणाम न झाल्याने यावेळी मनसेने गांधीवादी मार्ग स्वीकारत आमरण उपोषणाचा निर्णय घेतला आहे. संघर्षाची भूमिका घेणारी मनसे यावेळी महात्मा गांधींच्या अहिंसक आंदोलनाच्या मार्गाने प्रशासनाला जाग आणण्याचा प्रयत्न करणार आहे.

मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर आणि पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले यांनी सर्व नागरिक, महिला भगिनी, युवक, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक संस्था आणि विविध संघटनांना या आंदोलनाला भरभरून पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, अनेक नागरिकांनी या भूमिकेचे स्वागत केले असून, "यावेळी केवळ आंदोलन नको, तर कायमस्वरूपी तोडगा निघाला पाहिजे," अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

त्यामुळे आता रायगड जिल्ह्यातील या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे."खळ्ळखट्याकनंतर गांधीगिरी; डान्स बार बंदीसाठी मनसेचा निर्णायक लढा!"

# जासई विद्यालयात प्राचार्या सौ. म्हात्रे के. जी . मॅडम यांचा सेवापूर्ती व सेवागौरव सन्मान सोहळा उत्साहात साजरा !!

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी / सागर घरत** : रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा .पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग , जासई ता. उरण , जि. रायगड या विद्यालयात शुक्रवार दिनांक 19 जून 2026 रोजी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. म्हात्रे के. जी . मॅडम यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा कौटुंबिक वातावरणात संपन्न झाला .या कार्यक्रमाच्या सुरुवातीस ढोल व लेझीम च्या तालावर पुष्पवृष्टी करत औक्षण करून त्यांच्या कुटुंबासमवेत त्यांचे स्वागत करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे चेअरमन श्री जगे साहेब तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन





व दिप प्रज्वलन झाल्यानंतर इशास्तवन व स्वागताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले . त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत करण्यात आले . अठ्ठावन्न दिव्यांनी औक्षण करून शाळेकडून मॅडमचा त्यांच्या पतीसह यथोचित सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री कुटे सर यांनी मॅडमचा जीवन प्रवास मांडला. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम, ज्येष्ठ शिक्षक श्री. गाताडी सर, तोरणे सर , सौ वर्तक मॅडम यांनीही मॅडमबद्दल आपले विचार व्यक्त केले. विद्यालयाचे विद्यार्थी साहिल घरत आणि सान्वी घरत यांनीही मॅडम बद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या . उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत मांडले . करंजा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे मॅडम ,सत्कारमूर्तींचे पती श्री . म्हात्रे सर , मुलगी प्रेरणा , मुलगा प्रितम, जावई शेलार सर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या . हिंदी विषयतज्ञ , प्राश्निक, मुलींसाठी मार्गदर्शन , शिस्त , विविध सामाजिक कार्यक्रमात सहभाग यांचे वर्णन सर्वांच्या मनोगतातून करण्यात आले . प्राचार्या मॅडम यांनी आपल्या मनोगतात आपला पूर्ण जीवन प्रवास थोडक्यात वर्णन केला . या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन श्री अरुणशेठ जगे साहेब , नरेश शेठ घरत , सरपंच संतोष घरत , रघुनाथ तात्या , गणेश पाटील , यशवंत शेठ , आदित्य घरत ,घरत साहेब फुंडे हायस्कूल चे रयत सेवक , प्राचार्या मॅडम चे कुटुंबीय , सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते . हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात आणि उल्हासदायी वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला . संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री . गाताडी सर आणि घरत एम के मॅडम यांनी केले.

# साईनगर परिसरात उभारलेल्या पोलीस मदत केंद्राचा लाभ विभागातील नागरिकांना होणार : पोलीस उपायुक्त परिमंडळ 3 पनवेल रश्मी नांदेडकर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी :** साईनगर परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सहकार्याने आज साईनगर या ठिकाणी नवीन पोलीस मदत केंद्र स्थापित करण्यात आले आहे. त्याचा फायदा परिसरातील नागरिकांना होणार आहे व या ठिकाणी पोलीस कार्यरत राहणार आहेत असे प्रतिपादन पोलीस उपायुक्त परिमंडळ 3 पनवेलच्या रश्मी नांदेडकर यांनी या पोलीस मदत केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी केले.

सदर नवीन साईनगर पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपायुक्त परिमंडळ 3 पनवेल श्रीमती रश्मी नांदेडकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. यावेळी वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह स्थानिक नगरसेवक लतिफ शेख व इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग आणि साई नगर परिसरातील नागरिक उपस्थित होते. सदर पोलीस मदत केंद्र हे स्थानिक नगरसेवक लतिफ शेख यांच्या माध्यमातून उभारण्यात आले असून साईनगर हा परिसर नव्याने विस्तार




होत असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी या पोलीस चौकीचा मोठा उपयोग होणार असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांनी यावेळी दिली.

# अनधिकृत बांधकामांची माहिती द्यायची नाही, पण अर्ज अमान्य करायचा?

## पनवेल महापालिकेची भूमिका संशयास्पद – दिपक कोळवणकर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** प्रभाग समिती "ड" कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची माहिती माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविल्यानंतरही पनवेल महानगरपालिकेकडून स्पष्ट माहिती देण्याऐवजी अर्ज अमान्य करण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.तक्रारदार दिपक कोळवणकर यांनी प्रभाग समिती "ड" क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची यादी, त्यांच्यावर झालेली कारवाई व संबंधित तपशील मागविला होता. तसेच जर एकही अनधिकृत बांधकाम अस्तित्वात नसेल तर त्याबाबत लेखी प्रमाणपत्र देण्याची मागणी केली होती. मात्र माहिती देण्याऐवजी अर्जच अमान्य करण्यात आला.विशेष म्हणजे प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त



रूपाली माने यांनी देखील माहिती उपलब्ध करून देण्याऐवजी मागणी फेटाळल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात अनेक शंका निर्माण होत आहेत. एकीकडे महापालिका शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्याचे दावे करते, तर दुसरीकडे अशा बांधकामांची माहिती लेखी स्वरूपात देण्यास का टाळाटाळ केली जाते, हा खरा प्रश्न आहे. जर अनधिकृत बांधकामे आहेत तर त्यांची माहिती द्यायला काय अडचण आहे? आणि नसतील तर "प्रभाग समिती ड क्षेत्रात एकही अनधिकृत बांधकाम नाही" असे लेखी देण्यास प्रशासन का तयार नाही?माहिती अधिकार कायदा हा पारदर्शकतेसाठी असून नागरिकांना माहिती मिळणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र पनवेल महानगरपालिकेची भूमिका पाहता माहिती लपविण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा संशय व्यक्त केला जात आहे.अनधिकृत बांधकामांबाबत माहिती देण्याऐवजी अर्ज अमान्य करण्याची पद्धत म्हणजे सत्य दडपण्याचा प्रयत्न आहे का, असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे. प्रशासनाने या प्रकरणात स्पष्ट भूमिका घेऊन मागितलेली माहिती तात्काळ जाहीर करावी, अशी मागणी दिपक कोळवणकर यांनी केली आहे.नधिकृत बांधकामे असतील तर यादी द्या;* *नसतील तर तसे लेखी द्या. पण माहितीच* *द्यायची नाही, हा कोणता पारदर्शक कारभार?" असा थेट सवाल दिपक कोळवणकर यांनी* *पनवेल महानगरपालिकेला केला आहे.

# वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेला MSF कर्मचाऱ्याने करून दिला मार्ग; सजग नागरिकाकडून कौतुक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल येथील एचडीएफसी सर्कलजवळील उड्डाणपुल परिसरात सायंकाळी सुमारे ६.५८ वाजण्याच्या सुमारास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. यावेळी एका रुग्णवाहिकेला वाहतुकीमुळे पुढे जाता येत नसल्याचे लक्षात येताच महाराष्ट्र सुरक्षा बल (MSF) कर्मचारी श्री. नितीन महांगडे (क्रमांक MSF2526773) यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ पुढाकार घेतला.

श्री. महांगडे यांनी स्वतः रस्त्यावर उतरून वाहतूक नियंत्रित करत संबंधित रुग्णवाहिकेला सुरक्षित व तात्काळ मार्ग उपलब्ध करून दिला. त्यांच्या या तत्परतेमुळे




रुग्णवाहिका वेळेत पुढे जाऊ शकली व रुग्णाला आवश्यक वैद्यकीय उपचार वेळेत मिळण्यास मदत झाली.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत एका सजग नागरिकाने माननीय मुख्यमंत्री महोदयांना पत्र पाठवून श्री. नितीन महांगडे यांच्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक केले आहे. तसेच त्यांच्या या सेवाभावी व कर्तव्यदक्ष कार्याची नोंद प्रशासकीय स्तरावर तसेच त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी, अशी विनंतीही पत्राद्वारे करण्यात आली आहे.

या घटनेबाबत पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. औदुंबर भा. पाटील यांनी श्री. महांगडे यांचे विशेष कौतुक केले. वाहतूक शाखेच्या अंमलदारांसमवेत कार्यरत असलेले MSF जवान अत्यंत सजगपणे, शिस्तबद्ध पद्धतीने व जबाबदारीची जाणीव ठेवून कर्तव्य बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. आपत्कालीन परिस्थितीत दाखविलेली तत्परता आणि कर्तव्यनिष्ठा ही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

श्री. नितीन महांगडे यांच्या या मानवतावादी व कर्तव्यदक्ष कार्याबद्दल नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव होत असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# परदेशी नागरिकाला घर भाड्याने दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :प्रतिनिधी :** परदेशी नागरिकाला घर भाड्याने देऊन सी फॉर्म न भरता त्याला बेकायदेशीररित्या राहण्यास मदत केल्याप्रकरणी अमित अशोक सिंग यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 18 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सानपाडा येथे राहणारे अमित अशोक सिंग यांनी नायजेरियन नागरिकाला शासनाच्या ऑनलाईन अधिकृत वेबसाईटवर सी फॉर्म न भरता त्याला निसर्ग




कॉम्प्लेक्स, फरशीपाडा, खारघर येथील घर भाड्याने देऊन बेकायदेशीररित्या राहण्यास मदत केली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# मोहदरी येथे पोखरा योजनेअंतर्गत शेती शाळेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोखरा) योजनेअंतर्गत मोहदरी येथे शेतकऱ्यांसाठी शेती शाळेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन तसेच शाश्वत शेती पद्धतींबाबत मार्गदर्शन करणे हा होता.यावेळी पोखरा योजना समन्वयक पवन चव्हाण यांनी शेतकऱ्यांना योजनेच्या विविध बाबी, उपलब्ध लाभ तसेच शेती उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेता येईल, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.शेती शाळेमध्ये गावातील शेतकरी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. उपस्थित शेतकऱ्यांनी विविध शेतीविषयक समस्यांवर प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले.या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आधुनिक व शाश्वत शेतीबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून, भविष्यात अशा उपक्रमांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.



# विलास बांडेबुचे शैक्षणिक क्षेत्र गौरव पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे विशेष प्रतिनिधी** : भंडारा पहेला येथील सामाजिक कार्यकर्ते विलास बांडेबुचे यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य




पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. विलास बांडेबुचे मागील 20 वर्षापासून शैक्षणिक व सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग असून सामान्य माणसावर अन्याय झाला तर नेहमी जागरूक असतात त्यांच्या कार्याची पावती म्हणून विलास बांडेबुचे यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

त्यांच्या या मिळालेल्या जिल्हास्तरीय सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारणीत महेंद्रशेठ यांचे महत्वाचे योगदान : रामशेठ ठाकूर

## महेंद्रशेठ घरत यांचे बॅडमिंटनसाठी अडीच लाख रुपयांचे प्रायोजकत्व

**दैनिक युवक आधार**
**उलवे,प्रतिनिधी** : "महेंद्रशेठ घरत हे गेली अनेक वर्षे कामगारांसाठी उत्तम काम करीत आहेत. आता तर जागतिक पातळीवर कामगारांच्या हक्कांसाठी लढतोय. त्याने उत्तम फिटनेस राखली आहे, तो साठीतही तरुणच असेल, एवढी त्याने व्यायामाने तब्बेत सांभाळली आहे. त्याला खेळाची आणि खेळण्याचीही आवड आहे. त्यामुळे खेळाडूंना तो नेहमीच प्रोत्साहन देत आला आहे. त्याने अनेक चांगले गुण आत्मसात केलेत. रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्प्लेक्स उभारणीसाठी त्याचे भरीव योगदान आहे, याची मला जाण आहे," असे माजी खासदार रामशेठ ठाकूर गुरुवारी (ता. १८) म्हणाले.

योनेक्स-सनराईझ रामशेठ ठाकूर रायगड जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप आणि निवड चाचणी १६ ते १८ जून रोजी घेण्यात आली. त्याच्या पारितोषिक वितरणप्रसंगी रामशेठ ठाकूर बोलत होते. बॅटमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडने याचे आयोजन केले होते. यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे प्रायोजक होते. त्यांनी अडीच लाख




रुपयांचे प्रायोजकत्व स्विकारले होते.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "रामशेठ ठाकूर हे देशात अव्वल असणाऱ्या रयत शिक्षण संस्थेचे सर्वाधिक मोठे देणगीदार आहेत. त्यांनी आपले सासरे दिवंगत जनार्दन आत्माराम भगत यांच्या नावे शिक्षण संस्था सुरू करून उच्च दर्जाच्या सोयी-सुविधा असणाऱ्या शाळा सुरू केल्या आहेत. उच्च गुणवत्ता हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य आहे. रामशेठ ठाकूर स्पोर्टस कॉम्प्लेक्स उभारणीसाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे, या कामात मी सुरुवातीपासून त्यांच्यासोबत आहे. १०० कोटींच्या घरात त्यांनी त्यासाठी खर्च केले आहेत, जेणेकरून खेळाडूंना उच्च दर्जाच्या सुविधा मिळतील. आज देशभरातून उलवे नोडमध्ये नागरिक राहायला आलेत, त्यांना आणि त्यांच्या मुलांना या स्टेडियमचा चांगला फायदा झाला आहे. त्यामुळे येथील खेळाडू येत्या काळात जागतिक पातळीवर चमकतील, असा मला ठाम विश्वास आहे. येथील बॅडमिंटन खेळाडूंना सहकार्य करीत आलो आहे, यापुढेही करणार आहे."

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध भागांतील खेळाडूंनी सहभाग घेतला. 184 खेळाडूंनी 25 गटांमध्ये 263 प्रवेशिका पाठविल्या. स्पर्धा मुले व मुलींसाठी एकेरी आणि दुहेरी प्रकारात 9 वर्षांखालील, 11 वर्षांखालील, 13 वर्षांखालील, 15 वर्षांखालील, 17 वर्षांखालील, 19 वर्षांखालील आणि खुला गट अशा विविध वयोगटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार रामशेठ ठाकूर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत, वाय. टी. देशमुख, साईकुमार जी., माताप्रसाद त्यागी हे विशेष उपस्थित होते. या प्रसंगी रामशेठ ठाकूर यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

स्पर्धेतील विजेते, उपविजेते आणि उपांत्य फेरीतील खेळाडूंना सुमारे 3 लाखांची रोख बक्षिसे व आकर्षक चषक प्रदान करण्यात आले. याशिवाय, मागील वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा विशेष सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# पोर्णिमा साखरे उत्कृष्ट ग्रामपंचायत विकास अधिकारी विदर्भस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे विशेष प्रतिनिधी** : भंडारा अड्याळ येथील ग्रामपंचायत विकास अधिकारी पौर्णिमा साखरे यांच्या शासकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात



विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. मागील 20 वर्षापासून शासकीय व सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घेतात. त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन त्यांच्या पोर्णिमा साखरे यांचा उत्कृष्ट ग्रामपंचायत विकास अधिकारी विदर्भस्तरीय पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .त्यांच्या या मिळालेल्या जिल्हास्तरीय सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# फुटपाथवर लावली पालिकेने जाळी, पादचार्‍यांना होतोय त्रास

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी** : नवीन पनवेल शहरातील वेंगसरकर अकॅडमी समोरील फुटपाथवर पनवेल पालिकेने जाळी लावली असून त्याचा त्रास जाणायेणाऱ्या पादचार्‍यांना होत आहे. त्यांना थेट रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सन 2025 मध्ये नवीन पनवेल कडून सुकापुरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला असणाऱ्या फुटपाथवर लोखंडी जाळी बसवण्यात



आली. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी ही लोखंडी जाळी काढण्यासाठी प्रयत्न केले मात्र पालिकेने अद्याप देखील ही लोखंडी जाळी काढलेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे आदित्य जानोरकर यांनी देखील त्यासंदर्भात पालिकेला पत्रव्यवहार केला. मात्र लोखंडी जाळी जैसे थे आहे. फुटपाथ शिल्लक नसल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघाताची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या ठिकाणी पादचाऱ्यांचा अपघात झाल्यास त्यास पालिकेचे अधिकारी जबाबदार असतील तसेच जाळी काढण्यासाठी वॉर्ड ऑफिसर अरविंद पाटील यांना फोन लावतो मात्र ते फोन उचलत नाही त्यामुळे हे अधिकारी जनतेची कामे काय करतील असे आदित्य जानोरकर यांनी सांगितले.

# रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी** : रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षारक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याची मागणी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांच्याकडे विनायक गांधी यांनी केली आहे.

नोंदित सुरक्षारक्षकांना नोकरी मिळण्यासाठी जून 2025 मध्ये कामगार मंत्री यांच्या दालनात आमदार विक्रांत पाटील यांनी बैठक आयोजित केली होती. त्यानंतर स्वतंत्र मेगा ड्राईव्ह लावण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र किती कंपन्या मंडळात नोंदी झाल्या, किती कंपन्यांवर कारवाई करून मंडळाचे सुरक्षा रक्षक तैनात केले गेले आणि काय कारवाई केली गेली त्याची माहिती रायगड सुरक्षा रक्षक मंडळाकडून सादर करण्यात आलेली नाही. रायगड जिल्हा कार्यक्षेत्रात इतर बृहन्मुंबई, ठाणे, पालघर सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षारक्षक मागील अनेक वर्ष काम करत आहेत. त्यामुळे रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षारक्षकांनी जायचे कुठे असा प्रश्न उपस्थित होत आहे. काही आस्थापनांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षारक्षक म्हणून काम केले जाते आणि कागदोपत्री या कर्मचाऱ्यांचा उल्लेख केअर टेकर म्हणून संबोधला जात आहे,

अशामुळे शासन नियमांची फसवणूक होत असल्याचे विनायक गांधी यांची म्हणणे आहे. तसेच सुरक्षारक्षकांची संख्या, कागदोपत्री कमी आणि अस्तित्वात जास्त तसेच सूट दिलेल्या सुरक्षारक्षकांना नियमानुसार सुविधा, सीक्युरिटी एजन्सीकडून मिळतात का याची तपासणी होणे गरजेचे आहे.

# शहानुर प्रकल्पात केवळ ३५ टक्के पाणीसाठा शिल्लक

## ऑगस्ट महिन्यापुरतेच पाणी; म.जी.प्रा.चे नागरिकांना जपून वापरण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी** : यंदा दुष्काळाचे सावट गडद होत असताना अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या शहानुर प्रकल्पातील पाणीसाठ्याने चिंता वाढवली आहे. सध्या प्रकल्पात केवळ ३५ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक असून तो फक्त येणाऱ्या ऑगस्ट महिन्यापुरताच पुरेल, असा इशारा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाने दिला आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपकार्यकारी अभियंता अनिकेत केलो यांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने व जपून वापर करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, "यावर्षी पर्जन्यमान



कमी असल्याने दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. शहानुर प्रकल्प हाच अंजनगाव सुर्जी शहर व परिसराचा मुख्य पाणीपुरवठा स्रोत आहे. सध्या उपलब्ध असलेला ३५ टक्के साठा ऑगस्टपर्यंतच तग धरेल. त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करावे.पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. नळांना तोट्या बसवा. पाणी वाया जाणार नाही याची काळजी घ्या. गळती तात्काळ दुरुस्त करा. घरातील व सार्वजनिक नळांची गळती थांबवा. पुनर्वापरावर भर द्या. भाज्या धुतलेले पाणी झाडांना द्या. वाहने धुणे, अंगण शिंपडणे टाळा. अतिरिक्त पाणी वापरणारे कामे पुढे ढकला. सार्वजनिक ठिकाणी जागरूकता. पाणी वाया घालवणाऱ्यांना रोखा. अशा सुचना नागरिकांना अंजनगाव सुर्जी जीवन प्राधिकरण उपकार्यकारी अभियंता अनिकेत केलो यांनी नागरिकांना केल्या आहे.दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे प्रत्येक थेंब महत्त्वाचे असल्याने प्रशासनासोबतच नागरिकांनीही जबाबदारीने पाऊल उचलणे गरजेचे आहे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सणसर ग्रामपंचायत निवडणुकीची चाहूल युवा इच्छुक ‘ॲक्शन मोड’वर

## सरपंच पदासाठी राजकीय अनुभवी महिला उमेदवारीस देणार पसंती

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय** : सणसर ग्रामपंचायत निवडणुकीस अद्याप काही काळ असला,तरी गावातील राजकीय वातावरण मात्र आतापासूनच तापू लागल्याचे चित्र दिसून येत आहे. नुकतीच वॉर्डरचना व आरक्षण जाहीर झाल्यानंतर ग्रामपंचायत निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले अनेक युवा कार्यकर्ते ॲक्शन मोडवर आल्याचे गावातील हॉटेल आणि चौकात दिसायला लागले आहेत.गावातील चौक,हॉटेल, चहाच्या टपऱ्या आणि सार्वजनिक ठिकाणी सकाळपासून रात्रीपर्यंत निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा रंगत असल्याचे पाहायला मिळत आहे. कोणत्या वॉर्डातून कोण उमेदवारी करणार,कोणत्या गटाशी हातमिळवणी होणार आणि मतदारांपर्यंत कसे पोहोचायचे,याबाबत इच्छुकांकडून जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.वॉर्डनिहाय आरक्षण जाहीर झाल्यामुळे अनेकांनी आपापली राजकीय'फिल्डिंग' लावण्यास सुरुवात केली असून,समर्थकांच्या बैठका,गाठीभेटी केक कापून वाढदिवस साजरा करणे आणि संपर्क मोहिमा वेगाने सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.दिवसेंदिवस इच्छुकांची संख्या वाढत असल्याने यंदाची ग्रामपंचायत निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान,निवडणुकीच्या हालचालींचा परिणाम स्थानिक हॉटेल व्यवसायावरही दिसून येत आहे.विविध गटांच्या बैठका,चहापान,जेवण आणि चर्चांमुळे हॉटेल व्यवसायात चांगलीच वाढ झाल्याची माहिती काही हॉटेल व्यावसायिकांनी दिली. निवडणुकीच्या निमित्ताने विविध ठिकाणी छोट्या-मोठ्या गपचूप बैठका आणि मेळावे होत असल्याचेही चित्र आहे.निवडणूक अद्याप जाहीर झालेली नसतानाही अनेक कार्यकर्त्यांनी प्रचाराची अप्रत्यक्ष तयारी सुरू केल्याचे दिसत आहे मतदारांशी संपर्क वाढविणे,सामाजिक कार्यक्रमांमध्ये उपस्थिती लावणे आणि स्थानिक प्रश्नांवर भूमिका मांडणे यावर इच्छुकांचा भर असल्याचे बोलले जात आहे.एकूणच सणसर ग्रामपंचायत निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच गावातील राजकीय वातावरण रंगात आले असून,आगामी काळात या हालचाली आणखी वेग घेण्याची शक्यता युवकांकडून व्यक्त केली जात आहे.

# कुलदीप गंधे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे विशेष प्रतिनिधी** : भंडारा निमगाव येथील सामाजिक कार्यकर्ते कुलदीप दीपक गंधे यांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी ,



व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता.

कुलदीप गंधे मागील 10 सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग असून सामान्य माणसावर अन्याय झाला तर नेहमी जागरूक असतात त्यांच्या कार्याची पावती म्हणून कुलदीप दीपक गंधे यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .त्यांच्या या मिळालेल्या जिल्हास्तरीय सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# उभरते सितारे — 'प्रेरणा आणि सन्मान'

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर** : उभरते सितारे या मंचावर मुलांचा परिचय पाहून मन आनंदी झाले. हे मुलं खूप हुशार, मेहनती आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण आहेत. हीच मुलं पुढे जाऊन इतरांसाठी प्रेरणा ठरतील. मी स्वतः 94 वेळा रक्तदान केले आहे. कुणाला रक्ताची गरज असेल तर संपर्क करू शकता. रक्तदान हे एक महान दान आहे. यासाठी तुम्ही इतरांनाही प्रेरित करा. हा विचार राजेश नाईक यांनी मुलांमध्ये आणि त्यांच्या पालकांमध्ये मांडला.

विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या नवोदित प्रतिभांना समर्पित उपक्रम 'उभरते सितारे' चे आयोजन हिंदी मोर भवनाच्या उत्कर्ष हॉलमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाचा विषय 'प्रेरणा आणि सन्मान' हा होता आणि तो शिक्षणवर्धक, ज्ञानवर्धक आणि



संगीतमय सादरीकरणांनी परिपूर्ण होता. कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते आणि मुख्य अधीक्षक डॉ. राजेश माणिकारावजी नाईक उपस्थित होते. त्यांचा सन्मान संयोजक युवराज चौधरी यांनी स्वागतवस्त्र आणि स्मृतिचिन्ह देऊन केला.

यानंतर सर्व मुलांनी भव्य नृत्य आणि गाण्यांची सादरीकरण केली. यात मूव्ही मिक्स डान्स स्टुडिओच्या कोरियोग्राफर संपूर्णा रेमंडल यांच्या मार्गदर्शनाखाली जिआना खरात, श्रीहान पाल, मनश्री कुर्वे, वेहान बोपचे, नैंसी बोपचे, नायरा पारधी, यालिनी सिपाणा, गुंजन वंजारी, प्रणन्या मोहोड इत्यादींनी सुंदर नृत्य सादर केले. संपूर्णा रेमंडल यांनी शास्त्रीय नृत्य कथकाच्या सादरीकरणाने सर्वांचे मन जिंकले. काजल पांडे, माही मिश्रा, जिनीषा भोजवानी, त्रिशिका वाघमारे, जान्हवी तामगडे, आदित मिंज, रियांश कामरानी, सानवी मेश्राम, अवनी मेश्राम, विधी कृपलानी इत्यादींनी उत्कृष्ट गाणी सादर केली. शाश्वत गजबिये यांनी सुंदर की-बोर्ड वादन केले, त्यात सीमा लूहाने स्वर दिला.

मुलांच्या सादरीकरणाचे त्यांच्या पालकांसह राहुल गुप्ता, प्रणिता मोहोड, सीमा लूहा, शिवानी लूहा, गीता सुरेश मिंज, भूमि कामरानी, कुंदा मेश्राम, जया माथुर, मीनाक्षी केसरवाणी, माया खरात, रीमा पॉल, मनोज कुर्वे, वैशाली मदारे, जवाहर तरार, हीर दीपक कृपलानी आणि मोनिका रेमंडल यांनी भरभरून कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशासाठी प्रशांत शंभरकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तसेच उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांबद्दल आभार संयोजक युवराज चौधरी यांनी व्यक्त केले.

## आशा सेविका भरती संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** आशा सेविका भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत घनसावंगी तालुक्यातील पारडगाव येथील अर्जदार श्री.अर्जुन रामभाऊ ढेरे यांनी जिल्हा परिषद जालना येथील जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीत नमूद केल्या प्रमाणे तालुका आरोग्य अधिकारी यांना तक्रार अर्ज देऊन उमेदवाराने भरती प्रक्रियेत कागदपत्र तयार करून घेतले आहेत. याचा पुरावा तालुका आरोग्य अधिकारी यांना दिला असून,ते कुठलीही कारवाई करत नसल्याने संबंधित उमेदवारास ते पाठीशी घालण्याचा प्रयत्न करत आहेत. तालुका आरोग्य अधिकारी

आशा सेविका भरती प्रक्रियेत नियमांचे पालन न करता उमेदवारांच्या अर्ज व कागदपत्रांची योग्य तपासणी केली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित भरती प्रक्रियेत आर्थिक व्यवहार झाल्याची शंका व्यक्त करून संपूर्ण





प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदाराने मुख्य कार्यकारी अधिकारी, व जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद जालना यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी,अशी मागणी केली आहे.या तक्रारीमुळे संबंधित आशा सेविका भरती प्रक्रियेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सदरील प्रकरणात न्याय न मिळाल्यास जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही अर्जुन ढेरे यांनी दिला आहे.

## कै. माणिकराव दादा पालोदकर यांच्या जयंतीनिमित्त सिद्धेश्वर पतसंस्थेत विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्याचे भाग्यविधाते, सहकार व शिक्षण महर्षी, सिद्धेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक कै. माणिकराव दादा पालोदकर यांची जयंती १९ जून २०२६ रोजी मोठ्या आदराने साजरी करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांनी कै. दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

कै. माणिकराव दादा पालोदकर यांनी आपल्या दूरदृष्टीतून सिल्लोड तालुक्यात शैक्षणिक व सहकार क्षेत्रात मोठी क्रांती घडवली. ग्रामीण



भागातील विद्यार्थ्यांसाठी 'राजर्षी शाहू शिक्षण संस्थे'ची स्थापना, शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी 'सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना' आणि शेतकरी व व्यापाऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'सिद्धेश्वर नागरी सहकारी पतसंस्था' व 'सिद्धेश्वर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँके'ची उभारणी केली. त्यांच्या या दूरगामी कार्याचे स्मरण करत उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास सिल्लोड-सोयगाव विधानसभेचे आमदार मा. अब्दुल सत्तार, माजी विभागीय सहनिबंधक तथा जिल्हा परिषद सदस्य मा. देविदासराव पालोदकर, संस्थेचे चेअरमन मा. रामदास पालोदकर, सिल्लोड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मा. अब्दुल समीर, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक मा. रमेश जयस्वाल, माजी नगरसेवक मा. शंकरराव खांडवे, विनोद मंडलेचा, नगरसेवक विठ्ठलराव सपकाळ, कृष्णा पा. पालोदकर, तसेच संस्थेचे संचालक राजेंद्र आंबट, सागर पालोदकर व निलेश अवकाळे उपस्थित होते.

याप्रसंगी बलरावत सर, प्रफुल्ल हुरणे, सचिन मगर, निखिल पालोदकर, मुकेश पालोदकर, वाणी सर, सुनील लांडगे, मनोज झंवर, दुर्गाबाई पवार, अनिल पालोदे, शामराव कोल्हे, अमजद पठाण, विजय खाजेकर, सुदर्शन अग्रवाल, रामेश्वर समिंद्रे, गणेश पालोदकर, सचिन पालोदकर, ऋतूराज चव्हाण, जयस्वाल ताई, जितू आरके, बनसोड साहेब तसेच पतसंस्थेचे व्यवस्थापक भानुदास जंजाळ आणि कर्मचारी गणपत सोनवणे, सुभाष गोसावी व दत्ता पाईकराव यांची उपस्थिती होती.

## अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक, एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल : प्रतिनिधी** : अज्ञात वाहनाने रोडपाली सिग्नलवर दुचाकीला दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी अज्ञात वाहन चालका विरोधात 19 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 19 जून रोजी दुपारी दोनच्या सुमारास किशनमोहन सुबोध झा (वय 31) हा दुचाकीवरून प्रवास करत होता. तो रोडपाली सिग्नल पनवेल मुंब्रा वाहिनीवर रोडपाली येथे आला असता अज्ञात वाहन चालकाने





त्याच्या दुचाकीला ठोकर मारली. यात किशनमोहन गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर वाहन चालक पळून गेला.

## सोन्याची चैन खेचली

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी : पायी** चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील १२ ग्राम वजनाची सोन्याची चैन खेचून चोरटे मोटरसायकल वरून पळून गेले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 18 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.अंजू मोरे या सेक्टर 35 आय, खारघर येथे राहत असून 17 जून रोजी त्या रात्री सव्वा दहा ते साडेदहाच्या दरम्यान साई सिंफनी बिल्डिंग सेक्टर 3 5, खारघर येथे पायी चालत जात होत्या. यावेळी दोन इसमानी त्यांच्या पाठीमागून काळया रंगाच्या मोटरसायकल वरून त्यांच्या गळयातील सोन्याची चेन खेचून ते पळून गेले.

## विवाहबाह्य संबंधातून उद्भवलेल्या वादाचा दुर्दैवी शेवट; प्रियकराकडून ४२ वर्षीय विवाहित महिलेची हत्या

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : अलिबाग तालुक्यातील नवेदर-नवगाव परिसरात घडलेल्या एका धक्कादायक हत्याकांडाने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. विवाहबाह्य प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वादातून ४२ वर्षीय विवाहित महिलेची तिच्याच प्रियकराने निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली असून, अलिबाग पोलिसांनी या प्रकरणात तत्पर कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या घटनेमुळे नवेदर-नवगावसह संपूर्ण अलिबाग तालुक्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत महिलेचे नाव छाया जगदीश पाटील (वय ४२) असे आहे. त्यांचे त्याच गावातील निलेश एकनाथ घासे (वय ४२) याच्याशी काही काळापासून विवाहबाह्य प्रेमसंबंध असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. या संबंधांमुळे महिलेच्या वैवाहिक जीवनात तणाव निर्माण झाला होता. कुटुंबीयांना या संबंधांची माहिती मिळाल्यानंतर पती-पत्नीमध्ये वारंवार वाद होत



असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी महिलेचा तिच्या पतीसोबत पुन्हा एकदा तीव्र वाद झाला होता. या वादानंतर त्या थेट आरोपी निलेश घासे यांच्या घरी गेल्या. तेथे दोघांमध्ये काही कारणावरून जोरदार शाब्दिक वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. संतापाच्या भरात आरोपीने महिलेला बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत महिलेला गंभीर दुखापती झाल्या आणि त्यांचा मृत्यू झाला.घटनेनंतर महिलेला उपचारासाठी अलिबाग सिव्हिल रुग्णालयात नेण्यात आले. सुरुवातीला या प्रकरणाची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली होती. मात्र, मृतदेहावरील जखमा आणि वैद्यकीय तपासणीत आढळलेल्या संशयास्पद बाबींमुळे पोलिसांचा संशय बळावला. त्यानंतर पोलिसांनी तपासाची दिशा बदलत सखोल चौकशी सुरू केली.

दरम्यान, मृत महिलेचा मुलगा जय जगदीश पाटील याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यानंतर घटनास्थळाची पाहणी करून फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. पथकाने घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा केले असून त्याच्या आधारे तपास अधिक वेगाने सुरू करण्यात आला. तपासादरम्यान समोर आलेल्या पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी आरोपी निलेश एकनाथ घासे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयात हजर करून पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. आरोपीची यापूर्वी कोणतीही गुन्हेगारी नोंद नसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असले तरी, क्षणिक संतापातून घडलेल्या या घटनेने एका महिलेचा जीव गेला आणि दोन कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे.या घटनेनंतर नवेदर-नवगाव परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. विवाहबाह्य संबंध, त्यातून निर्माण होणारे कौटुंबिक तणाव आणि संतापाच्या भरात घेतलेले टोकाचे निर्णय किती भीषण परिणाम घडवू शकतात, याचे हे आणखी एक गंभीर उदाहरण असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. सध्या या प्रकरणातील सर्व पैलूंचा तपास पोलीस यंत्रणेकडून सुरू असून, पुढील तपासातून आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## फेरीवाले, हॉकर्सचा धडक मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय व महापालिकेवर धडकला

**दैनिक युवक आधार:**

**श्रीक्षेत्र माहूरगड:प्रतिनिधी /सय्यद इसा:** नांदेड महापालिका आणि पोलीस पथका मार्फत शहरातील फेरीवाल्याना टार्गेट करीत बेकायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

सीटू संलग्न नांदेड महानगर हॉकर्स युनियनच्या वतीने यापूर्वी हजारोंचे मोर्चे काढून मनपाला राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यास सीटू कामगार संघटनेने भाग पाडले होते.तत्कालीन मनपा आयुक्त यांनी हॉकर्स झोन तयार करण्याचे आश्वासन संघटनेस दिले होते.परंतु लाभाच्या कार्यामध्ये व्यस्त असलेल्या मनपास कायदेशीर अंमलबजावणी करण्याचा विसर पडला असून मागील काही दिवसापासून शहरातील पथविक्रेते व फेरीवाल्याना शहरातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न सुरु केला आहे.मोक्याचे भूखंड हडप करणाऱ्यावर व मोठ्या राजकीय पुढाऱ्यांनी केलेल्या अतिक्रमण धारकांवर कार्यवाही करण्याची हिम्मत मनपा मध्ये नाही.

९ मे रोजीच्या मेळाव्यात १८ मे रोजी महापालिकेवर धडक मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. गांधी नगर, महावीर चौक, वजीराबाद, टिळक नगर, आंनद नगर, तरोडा नाका, श्री नगर येथे शाखा स्थापन करण्यात आल्या आहेत.

वरील सर्व शाखा अध्यक्ष सचिवांनी १८ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालय व मनपावर काढण्यात आलेल्या मोर्चा ची जोरदार तयारी करण्याचा संकल्प केला होता





> **कलामंदिर, डॉक्टर लाईन सह शहरातील मोक्याचे भूखंड हडप करणाऱ्यांना दिलासा देणाऱ्या व पदोन्नती, पूरग्रस्त निधी व यादी घोटाळा तसेच सफाई कामगार घोटाळा करणाऱ्या आणि फेरीवाल्याना नाहक बेकायदेशीररित्या त्रास देणाऱ्या मनपाचा पर्दाफाश केला असून ३ जून रोजी मुंबई मंत्रालयावर मोर्चा काढून नांदेड येथील हॉकर्स चे प्रश्न मांडणार आहे.**
>
> **- कॉ.गंगाधर गायकवाड,**
> **अध्यक्ष- नांदेड महानगर हॉकर्स युनियन संलग्न सीटू**

मोर्चाला सीटू राज्य सचिव कॉ. उज्वला पडलवार, राज्य कमिटी सभासद कॉ.करवंदा गायकवाड, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या अध्यक्षा कॉ.लता गायकवाड, प्रगती बांधकाम कामगार संघटनेचे सचिव वसीम अब्दुल यांनी संबोधित केले तर मोर्चा चे नेतृत्व अध्यक्ष कॉ.गंगाधर गायकवाड, सचिव कॉ.जयराज गायकवाड, कॉ. श्याम सरोदे,उपाध्यक्ष कॉ. मुकेश गर्दनमारे, वजीराबाद शाखेचे अध्यक्ष मोनू सिंग महाराज,सचिव शिवकुमार मिनके,उपाध्यक्ष प्रभावती नांदेडकर,नय्युम कासार,पंकज कांबळे, कॉ. मंगेश वट्टेवाड, कॉ. मुकेश गर्दनमारे, महेंद्र भटलाडे,कॉ. राहुल नरवाडे, कॉ.सुभाषचंद्र गजभारे,कॉ. मारोती केंद्रे,कॉ. सचिन सरोदे,सुनील पाटील, शशांक गायकवाड आदींची केले.

तळपत्या उन्हात फेरीवाले, पथविक्रेते, रस्त्याच्या कडेला छोटा व्यापार करणारे व्यापारी यांनी मोर्चात मोठ्या संख्येने सामील होऊन महापालिका व जिल्हा प्रशासनाच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली.जिल्हाधिकारी आणि आयुक्तांना निवेदन देण्यात आले असून ३ मे ला मुंबई मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चा मध्ये नांदेड येथील अनेक हॉकर्स सामील होणार आहेत अशी माहिती अध्यक्ष कॉ.गायकवाड यांनी दिली आहे.

## मृगाचा पाऊस


मृगाचा पाऊस नाहीसा झाला,
निसर्गाचा कोप म्हणायचं का त्याला,
निसर्गाला आता विचारायचं कोणी,
सर्वांच्या आता आलय ध्यानी ,
दुबार पेरणीचे संकट आलं,
होतं नाही ते रुपया पैसा निघून गेलं,
पिण्याच्या पाण्याची लागली चिंता,
धावपळ आता करु लागली जनता,
सरकारची धावपळ झालीया सुरु,
आत्तापर्यंत काही जिल्ह्यात पिक विमा नाही दिला मिळू,
सरकार मायबाप याकडे लक्ष द्यावं,
बळीराजांचे दुःख थोडं वाटून घ्यावं.

**शब्द संकलन= सय्यद इसा सर**
**दैनिक युवक आधार ता.प्रतिनिधी माहुर गड.**

## अति उष्णतेमुळे शेतातील शेडला आग ; तीन लाखांहून अधिक नुकसान, शासन मदतीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणीच्या तालुक्याच्या शेवटच्या बॉर्डर वर असलेले निलंगा तालुक्यातील गिरकचाळ जमीन सर्वे नंबर, 156.1.29 R जमीन मालकी येथील शेतकरी प्रशांत बबन शिंदे (वय 40) यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडला दि, 19 जून शुक्रवारी दुपारी अचानक आग लागून सुमारे तीन लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचे शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. अति उष्णतेमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.या आगीत 10 एच.पी. इंजिन, दोन पाणीपुरवठा मोटारी, पेरणीसाठी साठवून ठेवलेले साहित्य, डीएपी, पोटॅशसह विविध रासायनिक खते, स्प्रिंकलर संचाचे पाईप, कडबा, ऊस गाळपाचे साहित्य तसेच संपूर्ण पत्र्याचे शेड जळून नष्ट झाले आहे.घटनेची माहिती तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना देण्यात आली असून पंचनामा करण्याची मागणी करण्यात आली आहे. नुकसानीचा प्राथमिक अंदाज तीन लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात



येत आहे.महसूल विभागाकडून पंचनामा झाल्यानंतर शासनाच्या नैसर्गिक आपत्ती व आग दुर्घटना मदतीसंदर्भातील लागू नियम, निकष व तरतुदीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यास आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर झालेल्या या नुकसानीमुळे शेतकरी कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून प्रशासनाने तातडीने पाहणी करून मदत द्यावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# गणिताची आवड आहे? मग फक्त इंजिनिअरच नाही, 'ॲक्च्युअरी' देखील बना!

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वित्तीय व ॲक्च्युरियल गणिताचा अभिनव पदवी अभ्यासक्रम

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** दरवर्षी नागपूर व विदर्भातील हजारो विद्यार्थी गणित विषयासह बारावी (HSSC) उत्तीर्ण होतात. यापैकी बहुतेक विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय, चार्टर्ड अकाउंटन्सी, बँकिंग किंवा डेटा सायन्स यांसारख्या करिअर पर्यायांची माहिती असते. मात्र, जगातील सर्वाधिक प्रतिष्ठित आणि उच्च वेतन देणाऱ्या व्यवसायांपैकी एक असलेल्या 'ॲक्च्युअरी' या व्यवसायाबद्दल फारच कमी विद्यार्थ्यांना माहिती असते.

ॲक्च्युअरी हा असा व्यावसायिक असतो जो गणित, सांख्यिकी, वित्तशास्त्र आणि डेटा विश्लेषण यांच्या साहाय्याने आर्थिक जोखीमांचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन करतो. विमा कंपन्या, बँका, गुंतवणूक संस्था, पेन्शन फंड, आरोग्य क्षेत्रातील संस्था तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये ॲक्च्युअरी महत्त्वाची भूमिका बजावतात. भविष्यातील आर्थिक जोखमींचा अंदाज घेऊन ते संस्थांना योग्य आर्थिक निर्णय घेण्यास मदत करतात.

**आकर्षक वेतन आणि उज्ज्वल करिअर**

गणित आणि विश्लेषणात्मक विचारसरणीची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ॲक्च्युरियल सायन्स हे सर्वात आकर्षक करिअर पर्यायांपैकी एक मानले जाते. ॲक्च्युरियल परीक्षांमधील काही टप्पे यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी ॲक्च्युरियल ॲनालिस्ट म्हणून करिअरची सुरुवात करू शकतात. अनुभवी आणि पात्र ॲक्च्युअरी हे वित्तीय क्षेत्रातील सर्वाधिक वेतन घेणाऱ्या व्यावसायिकांमध्ये गणले जातात. भारतासह जगभरात त्यांना मोठी मागणी आहे.

**ॲक्च्युअरी बनण्याचा थेट मार्ग**

भारतात ॲक्च्युअरी व्यवसायाचे नियमन इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्च्युअरीज ऑफ इंडिया (IAI) ही संस्था करते. ॲक्च्युअरी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही संस्था व्यावसायिक परीक्षा आयोजित करते. या परीक्षा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असून विमा कंपन्या, बँका, गुंतवणूक संस्था आणि वित्तीय क्षेत्रात त्यांना विशेष महत्त्व आहे.

या व्यावसायिक परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांना पदवी स्तरावरच करता यावी यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्वायत्त गणित विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बी.एस्सी. (AEDP/ऑनर्स/ऑनर्स विथ रिसर्च) गणित – वित्तीय व ॲक्च्युरियल गणित विशेषीकरण हा अभिनव अभ्यासक्रम सुरू केला आहे.



या अभ्यासक्रमामध्ये फायनान्शियल मॅथेमॅटिक्स, सर्व्हायवल ॲनालिसिस, रिस्क मॉडेलिंग, स्टॅटिस्टिक्स, फायनान्शिअल मार्केट्स, ॲक्च्युरियल रिस्क मॅनेजमेंट, डेटा ॲनालिटिक्स, पायथॉन प्रोग्रामिंग, आर. प्रोग्रामिंग या सारख्या आधुनिक व उद्योगाभिमुख विषयांचा समावेश आहे. हे विषय IAI च्या प्रारंभिक ॲक्च्युरियल परीक्षांशी सुसंगत असल्याने विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणादरम्यानच ॲक्च्युअरी होण्याचा प्रवास सुरू करता येतो.

**शिक्षणासोबत उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव**

या अभ्यासक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अप्रेंटिसशिप ऐम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP). या अंतर्गत विद्यार्थ्यांना उद्योग भागीदारांसोबत इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिपची संधी मिळते. त्यामुळे शिक्षण घेत असतानाच प्रत्यक्ष उद्योगातील अनुभव, व्यावसायिक कौशल्ये आणि रोजगारक्षमता वाढविण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते.

**विविध करिअर संधी**

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील क्षेत्रांमध्ये करिअर करता येईल: ॲक्च्युरियल ॲनालिस्ट, रिस्क ॲनालिस्ट, इन्शुरन्स ॲनालिस्ट, फायनान्शियल ॲनालिस्ट, इन्व्हेस्टमेंट ॲनालिस्ट, बिझनेस ॲनालिस्ट, डेटा ॲनालिस्ट, क्वांटिटेटिव्ह ॲनालिस्ट

याशिवाय विद्यार्थी ॲक्च्युरियल सायन्स, फायनान्शिअल मॅथेमॅटिक्स, डेटा सायन्स, स्टॅटिस्टिक्स, बँकिंग, फायनान्स आणि संबंधित विषयांमध्ये उच्च शिक्षणही घेऊ शकतात.

**विदर्भातील गणित विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी**

ज्या विद्यार्थ्यांना गणिताची आवड आहे आणि आर्थिकदृष्ट्या यशस्वी व प्रतिष्ठित करिअर घडवायचे आहे, त्यांच्यासाठी वित्तीय व ॲक्च्युरियल गणित हा अभ्यासक्रम एक उत्कृष्ट संधी आहे. आपल्या भागात ॲक्च्युरियल सायन्सबद्दल जागरूकता अद्याप कमी असली तरी जगभरात कुशल ॲक्च्युअरी व्यावसायिकांची मागणी झपाट्याने वाढत आहे.

या अभिनव अभ्यासक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाच्या करिअरची दारे उघडत असून भविष्यातील ॲक्च्युअरी व्यावसायिकांची नवी पिढी घडविण्याचा प्रयत्न करीत आहे. डेटाचे विश्लेषण करणारे, जोखीम समजून घेणारे आणि योग्य निर्णय घेणारे व्यावसायिक हेच भविष्यात यशस्वी ठरणार आहेत. गणिताची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अशा उज्ज्वल भविष्याची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून होऊ शकते.

**प्रवेश सुरू – स्पॉट ॲडमिशन फेरी**

बी.एस्सी. वित्तीय व ॲक्च्युरियल गणित (Financial and Actuarial Mathematics) या अभ्यासक्रमासाठी स्पॉट ॲडमिशन प्रक्रिया सध्या सुरू आहे. इच्छुक विद्यार्थी व पालकांनी प्रवेश मार्गदर्शन, समुपदेशन तसेच अभ्यासक्रमाविषयी अधिक माहितीसाठी प्रवेश सुविधा केंद्र, ग्रामगीता भवन, विद्यापीठ परिसर, अमरावती रोड, नागपूर येथे संपर्क साधावा किंवा प्रत्यक्ष भेट द्यावी. प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# नाशिकमध्ये २३ जूनपासून 'ऑलिम्पिक सप्ताहा'चा थरार; विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : नाशिक /-२३ जून या 'जागतिक ऑलिम्पिक दिना'चे औचित्य साधून नाशिकमध्ये सलग १७ व्या वर्षी 'ऑलिम्पिक सप्ताहा'चे शानदार आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २३ ते ३० जून या कालावधीत हा क्रीडा सप्ताह साजरा होणार असून, श्री कालिका देवी मंदिर संस्थान, यशवंत व्यायाम शाळा (क्रीडा व सांस्कृतिक) आणि दुधारे स्पोर्ट्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहादरम्यान नाशिककरांना विविध जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धांचा थरार अनुभवायला मिळणार आहे.

**'ऑलिम्पिक रन'ने होणार सप्ताहाची सुरुवात**

ऑलिम्पिक सप्ताहाचा प्रारंभ २३ जून रोजी सकाळी ८:३० वाजता 'ऑलिम्पिक रन'ने होईल. काळाराम मंदिर ते कालिका मंदिर अशा आयोजित करण्यात आलेल्या या धावण्याच्या स्पर्धेचे (रण) उद्घाटन ऑलिम्पियन दत्तू भोकनळ आणि क्रीडामंत्र्यांचे माजी ओएसडी रवींद्र नाईक यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून केले जाईल. कालिका मंदिर येथे श्री अण्णासाहेब पाटील व दीपक पाटील हे सर्व क्रीडाप्रेमींचे स्वागत करतील.

**आठवडाभराचे क्रीडा व सामाजिक उपक्रम:**

२४ जून (सकाळी १०:०० वा.): कालिका मंदिर येथे 'जिल्हा जम्परोप स्पर्धा'.

२५ जून: त्रिमूर्ती चौकातील हेगडेवार मैदान येथे 'जिल्हा सेपक टकरा स्पर्धा'.

२६ जून (सकाळी ९:३० वा.): पर्यावरणपूरक उपक्रम म्हणून चामार लेणी टेकडीवर 'सीड बॉल्स (बीजगोळे) उधळण आणि वृक्षारोपण'.

२७ जून: हिरावाडी येथे 'जिल्हा बास्केटबॉल स्पर्धा'.

२७ जून: मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे 'फुटसाल राष्ट्रीय स्पर्धा' आणि 'जम्परोप राज्य स्पर्धां'चा थरार रंगणार आहे.

२८ जून (सकाळी १०:०० वा.): कालिका मंदिर येथे 'जिल्हा तलवारबाजी स्पर्धा'. याच दिवशी राष्ट्रीय फुटसाल व राज्य जम्परोप स्पर्धेचा समारोप होईल.

२९ जून (सकाळी १०:०० वा.): यशवंत व्यायाम शाळा येथे 'जिल्हा व्हॉलीबॉल स्पर्धा'.

३० जून रोजी भव्य समारोप आहे

या ऑलिम्पिक सप्ताहाचा आणि सर्व जिल्हा स्पर्धांचा भव्य समारोप ३० जून रोजी कालिका मंदिर सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे उपाध्यक्ष व माजी खासदार मनोज कोटक आणि सचिव संजय शेटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, त्यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना गौरविण्यात येईल.

**आयोजक व मार्गदर्शक:**

हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी छत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे, आनंद खरे आणि राजू शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अशोक कदम, दीपक निकम, अविनाश ढोली, उदय खरे, अविनाश वाघ, विक्रम दुधारे, तन्मय कर्णिक, भूषण सोडणीस, चिन्मय देशपांडे, मनीष बोरस्ते, रमेश क्षत्रिय, गणेश राऊत, भूषण भटाटे, शैलेश रकिबे, अंकुर सिंग, प्रवीण घोगरे, उमेश सेनभक्त आदी आयोजक आणि कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

नाशिकमधील क्रीडाप्रेमींनी आणि नागरिकांनी या सर्व स्पर्धांना उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा,

असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोदावरी अर्बन 'तर्फे तहसील कार्यालयास वॉटर कुलर भेट

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव: यवतमाळ** : बँकिंग सेवेसोबतच सामाजिक क्षेत्रात नेहमीच 'अग्रभागी राहणे' आणि समाजाचे ऋण फेडणे ही गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, नांदेडची परंपरा आहे. 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे संस्थेने आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती पुन्हा एकदा दिली आहे. महागाव शाखेच्या आठव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून, शुक्रवार, दि.19 जून 2026 रोजी येथील तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना शुद्ध आणि थंड पिण्याचे पाणी मिळावे, या उदात्त हेतूने संस्थेच्या वतीने एक वॉटर कुलर भेट देण्यात आले आहे.

या वॉटर कुलरचे उद्घाटन संस्थेचे सहाय्यक महाव्यवस्थापक (एजीएम) रवी इंगळे यांच्या हस्ते फीत कापून अत्यंत उत्साहात पार पडले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महागावचे कर्तव्यदक्ष तहसीलदार अभय म्हस्के ,उपस्थित होते. तहसील कार्यालयात गावखेड्यातून रोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येत असतात. उन्हाळा असो वा इतर कोणताही ऋतू, येथे येणाऱ्या लोकांची पाण्यासाठी 'वणवण'होत असे. 'गोदावरी अर्बन'ने नागरिकांची ही समस्या ओळखून वॉटर कुलर



भेट दिल्याने तहसीलदार अभय म्हस्के यांनी संस्थेच्या या लोकहितोपयोगी उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. आवश्यक असलेली मदत दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले. हा संपूर्ण कार्यक्रम गोदावरी अर्बनचे संस्थापक नामदार हेमंतभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनात आणि अध्यक्षा सौ. राजश्रीताई पाटील यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आला होता. व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या संकल्पनेतून

> **"महागाव तहसील कार्यालयात तालुक्यातील शेवटच्या टोकावरील नागरिक आपल्या विविध कामानिमित्त दररोज येतात. त्यांना पिण्याचे शुद्ध व थंड पाणी मिळावे, या उदात्त हेतूने 'गोदावरी अर्बन'ने आपली सामाजिक जबाबदारी समजून तहसील कार्यालयास एक मोठे वॉटर कुलर भेट दिले आहे. यामुळे गावखेड्यातून येणाऱ्या लोकांची तहान भागवली जाणार आहे.**
>
> **-रवी इंगळे,**
> **एजीएम, गोदावरी अर्बन.**

आणि उप-महाव्यवस्थापक सुरेखा दवे व एजीएम रवी इंगळे यांच्या खंबीर नेतृत्वात हा सामाजिक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमास महागाव शाखेचे शाखाधिकारी शशांक ढोबळे, असिस्टंट ऑफिसर सचिन हिंगाडे, जया घड्याले, ज्युनिअर ऑफिसर रामेश्वर शिंदे, सुयोग साकळे, ओमकुमार भोयर, अमोल रावते, प्रवीण आढागळे तसेच शाखेतील इतर कर्मचारी उपस्थित होते. गोदावरी अर्बन ही संस्था केवळ व्यवसाय न करता सामाजिक क्षेत्रात कायम अग्रणी असल्याची भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

# आवक-जावक व्यवस्थेचा बोजवारा ; पत्रे १०-१५ दिवस नोंदवहीतच नाहीत, तहसीलदारांचे दुर्लक्ष असल्याचा आरोप

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तहसील कार्यालयातील आवक-जावक व्यवस्थेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. सामान्य नागरिकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी, शासकीय कार्यालयांनी तसेच विविध संस्थांनी दिलेली पत्रे अनेकदा १० ते १५ दिवसांपर्यंत आवक-जावक नोंदवहीत नोंदवली जात नसल्याचे आरोप होत आहेत. परिणामी नागरिकांना आपल्या पत्राचे नेमके काय झाले, ते कोणत्या विभागाकडे गेले आणि कोणत्या अधिकाऱ्याकडे प्रकरण प्रलंबित आहे, याचा मागोवा घेण्यासाठी कार्यालयातील एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर हेलपाटे मारावे लागत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तहसील कार्यालयात दाखल झालेल्या अनेक पत्रांची वेळेत नोंद होत नसल्याने



प्रशासकीय कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एखादे पत्र दिल्यानंतर त्याची नोंद केव्हा होईल याची कोणतीही निश्चितता नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, आवक-जावक विभागातील नोंदवहीत अनेकदा पत्राच्या विषयाचा स्पष्ट उल्लेखच नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे संबंधित पत्र कोणत्या स्वरूपाचे आहे, कोणत्या विभागाशी संबंधित आहे आणि त्यावर पुढील कार्यवाही कोणी करायची, याचा मागोवा घेणे जवळपास अशक्य बनते. यामुळे पारदर्शकतेचा पूर्णतः अभाव असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही कर्मचाऱ्यांना कोणत्या विषयाचे पत्र कोणत्या विभागाकडे किंवा अधिकाऱ्याकडे पाठवायचे याबाबत पुरेशी माहिती नसल्याचेही दिसून येते. परिणामी अनेक पत्रे दिवसेंदिवस प्रलंबित राहत असल्याचा आरोप केला जात आहे.

**'शुक्रवार' म्हणजे कार्यालयाचा अनधिकृत सुट्टीचा दिवस?**

दर्यापूर तहसील कार्यालयात प्रत्येक शुक्रवार हा कर्मचाऱ्यांचा जणू "अनधिकृत हॉलिडे" असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. दर शुक्रवारी अनेक कर्मचारी रजेवर असल्याचे चित्र वारंवार दिसत असल्याने कामकाजावर त्याचा थेट परिणाम होत असल्याची तक्रार आहे.

महत्त्वाची कामे घेऊन आलेल्या नागरिकांना रिकाम्या खुर्च्या आणि "आज साहेब आले नाहीत" अशी उत्तरे ऐकून परत जावे लागत असल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

**तहसीलदार कार्यालयाला प्रशासनाचा धाक राहिला नाही का?**

तहसील कार्यालयातील या गंभीर त्रुटींकडे तहसीलदारांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे.

पत्रांची वेळेत नोंद, त्यांचे वर्गीकरण, संबंधित विभागाकडे तातडीने पाठविणे आणि नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे ही मूलभूत प्रशासकीय जबाबदारी असताना त्यात होत असलेला विलंब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करीत आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करावी**

प्रशासनातील या कथित अनागोंदीमुळे अनेक शासकीय कामे रखडत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन अचानक तपासणी करावी, आवक-जावक विभागाचे ऑडिट करावे, प्रलंबित पत्रांची यादी जाहीर करावी आणि दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

तहसील कार्यालयातील ही परिस्थिती जर अशी आहे, तर हि केवळ प्रशासकीय त्रुटी नसून सामान्य नागरिकांच्या हक्कांवर आणि पारदर्शक प्रशासनाच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब ठरू शकते.

आता जिल्हा प्रशासन याकडे कितपत गांभीर्याने पाहते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# २१ जून रोजी आयोजित १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिवसात सहभागी व्हा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड तालुका प्रतिनिधी रणजितसिह. ठाकूर** : २१ जून योग महोत्सव बारावा आंतरराष्ट्रीय योग दिवस हा सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केल्या जाणार असून यासाठी आयोजित कार्यक्रमात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पतंजली योग समितीचे गोपाल पाटील राऊत यांनी करताना यानिमित्त आयोजित वाशिम जिल्हा पतंजली समितीची नियोजन बैठक नुकतीच संपन्न झाली असल्याची माहिती दिली. योग दिनानिमित्त २० व २१ जून दोन दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस हा सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जात असताना या योग दिनानिमित्त वाशिम येथे पतंजली योग समितीचे बैठक नुकतीच पार पडली, जिल्हाध्यक्ष डॉक्टर भगवंतराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला पतंजली परिवाराचे जिल्हा संरक्षक गोपाल पाटील राऊत, डॉक्टर हरीश बाहेती, आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचे शंकरजी उजळे, जिल्हा प्रभारी यांचे मार्गदर्शन लाभले होते. बैठकीत वाशिम येथे पुसद नाका स्वागत लांभ मध्ये योग दिन उत्साहात साजरा करण्याचे ठरविण्यात आले आहे. या ठिकाणी २१ जूनला सकाळी सहा ते साडेसहा वाजेपर्यंत योग प्राणायामचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमाकरिता विविध क्षेत्रातील मान्यवर निमंत्रित मंडळी उपस्थित राहणार असून जनजागृतीकरिता योग दिंडी पदयात्रा ही २० जून २००० रोजी



सकाळी सात वाजता स्वागत लाणेतून काढण्यात येणार आहे. योग दिवस हा निमित्त आयोजित कार्यक्रमाच्या सरावाकरिता सर्व जनतेने उपस्थित राहावे व योग प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन पतंजली परिवाराचे गोपाल पाटील राऊत यांच्या वतीने करण्यात आले आहे.

योग दिनानिमित्त आयोजित नियोजित बैठकीला जिल्हाध्यक्ष भगवंतराव वानखडे, संपूर्ण पतंजली परिवाराचे कार्यकर्ते, सदस्य, पदाधिकारी प्राध्यापक आदेश कहाते, दीपक जी ए काळे, सुखदेव राजगुरु, दत्तराजी मुसळे, विलास जी ठाकरे, प्रवीण जी मोठे, शेषराव झांबरे, प्रकाश जाधव, मारुती अवघडे, कैलास गोस्वामी, रमेश महाले, कोषाध्यक्ष बेंद्रे साहेब, गोपाल कोठेकर, महिला पतंजलीच्या जिल्हाप्रमुख दीपाताई वानखडे यांच्यासह अनेक महिला व पुरुष उपस्थित होते. योग परिवाराच्या बैठकीचे समापन आभार प्रदर्शन नंतर शांतपीठाने करण्यात आले.

# आयसीटी संगणक प्रयोगशाळा व्यवस्थापन व मार्गदर्शन कार्यशाळा यशस्वी संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन, नाशिक विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली Skill Tree Consulting Ltd. मार्फत "आयसीटी संगणक प्रयोगशाळा व्यवस्थापन व मार्गदर्शन कार्यशाळा" यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये नाशिक विभागातील अहिल्यानगर, जळगाव, नाशिक, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांतील एकूण ४७२ शाळांमधील २६१ शिक्षकांचा सहभाग होता. कार्यशाळेचा मुख्य उद्देश शाळांमधील आयसीटी संगणक प्रयोगशाळांचे प्रभावी व्यवस्थापन, डिजिटल शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे तसेच शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाबाबत अद्ययावत मार्गदर्शन करणे हा होता.कार्यशाळेदरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ChatGPT चा शैक्षणिक वापर, माहिती सुरक्षा, डिजिटल शिस्त आणि सायबर सुरक्षा या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्यापन अधिक परिणामकारक, आकर्षक आणि विद्यार्थीकेंद्रित कसे करता येईल याविषयी तज्ज्ञांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली.सहभागी शिक्षकांना आयसीटी प्रयोगशाळांचे व्यवस्थापन, उपकरणांची देखभाल, डिजिटल संसाधनांचा प्रभावी वापर, ऑनलाइन सुरक्षितता, सायबर धोक्यांपासून संरक्षण तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या



विविध शैक्षणिक उपयोगांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध शंकांचे निरसन करून घेतले.

या उपक्रमामुळे शिक्षकांच्या डिजिटल कौशल्यांमध्ये वाढ होण्यास मदत होणार असून शाळांमधील आयसीटी प्रयोगशाळांचा अधिक प्रभावी वापर सुनिश्चित होणार आहे. तसेच "सुधारित शिक्षणासाठी शाळांचे बळकटीकरण" या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

नाशिक विभागातील शिक्षकांनी या कार्यशाळेचे स्वागत करत अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाधारित प्रशिक्षण उपक्रमांमुळे शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडून येतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.सदर कार्यशाळा नाशिक विभागातील सर्व सहभागी शिक्षकांसाठी ज्ञानवर्धक व उपयुक्त ठरली असून आयसीटी आधारित शिक्षण अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी ती महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

# "एक खासदार दोन आमदार हा रस्ता बघा कसा आहे दमदार !"

## जनतेचा संताप टोकाला; निवडणुकीतच धडा शिकवण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** (वाशीम)मालेगाव तालुक्यातील मालेगाव ते आमखेडा या मुख्य रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली असून, विशेषतः बोरगाव–पिंपळा–आमखेडा या मार्गाची परिस्थिती तर शब्दातही व्यक्त करता येणार नाही इतकी बिकट बनली आहे. रस्त्यावर सर्वत्र खडी उखडलेली, मोठमोठे खड्डे आणि धुळीचे ढग असे चित्र पाहायला मिळत असून, प्रवास करणे म्हणजे अक्षरशः जीव धोक्यात घालण्यासारखे झाले आहे.

"एक खासदार, दोन आमदार" अशी मोठी राजकीय ताकद या भागात असतानाही रस्त्यांची ही अवस्था पाहून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. दररोज शेकडो नागरिक, शेतकरी, विद्यार्थी या रस्त्याने प्रवास करतात; मात्र खराब रस्त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून



वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे.

या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अनेक वेळा—चार ते पाच वेळा—विविध दैनिकांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या, तरीही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे "हे प्रश्न आमदार-खासदारांपर्यंत पोहोचत नाहीत का?" असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

याहूनही गंभीर बाब म्हणजे,

**"एक खासदार, दोन आमदार" यांच्या मनामध्ये आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा तर विचार नाही ना?रस्ता इतक्या दिवसांपासून दुर्लक्षित ठेवून,निवडणूक लागल्यानंतरच काम सुरू करून श्रेय घेण्याचा डाव आखला जात आहे का?नागरिकांचा संतप्त सवाल**

**जर वेळेत रस्त्याचे काम झाले नाही, तर येणाऱ्या निवडणुकीत जनता याचे उत्तर मतपेटीतून देईल,असा इशारा नागरिकांनी दिला आहे.**

काही स्थानिक कार्यकर्त्यांनी हा प्रश्न जाणीवपूर्वक वरपर्यंत पोहोचू दिला नाही का, अशी शंका देखील व्यक्त होत आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच हा रस्ता मुद्दाम रखडवून ठेवला जातोय का, आणि निवडणुकीच्या तोंडावरच काम करून श्रेय घेण्याचा राजकीय डाव आखला जातोय का, अशी चर्चा आता जोर धरत आहे.

दरम्यान, नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, येणाऱ्या निवडणुकांमध्ये प्रचारासाठी येणाऱ्या उमेदवारांसह आमदार, खासदार आणि मंत्र्यांना थेट जाब विचारला जाईल. "मत मागायला येताना आधी रस्त्यांची उत्तरं द्या," असा ठाम पवित्रा जनतेने घेतला आहे.

एकूणच, मालेगाव ते आमखेडा मार्गासह बोरगाव–पिंपळा–आमखेडा या रस्त्यांची अवस्था पाहता जनतेचा संयम सुटत चालला आहे. आता केवळ आश्वासनांवर विश्वास न ठेवता, निवडणुकीतच उत्तर देण्याचा निर्धार नागरिकांनी केला असून, या संतापाची दखल लोकप्रतिनिधींनी तातडीने घेणे अत्यावश्यक झाले आहे.

# गायरानवाडी शाळेत 'हरित शाळा' उपक्रम त्रिफळा वृक्षारोपणातून निसर्ग संवर्धनाचा संकल्प

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** पुरातन काळापासून ज्येष्ठ महिन्यात येणाऱ्या शुक्ल पक्षाच्या षष्ठीला 'अरण्य षष्ठी' म्हटले जाते. सर्व सृष्टीला पोसणाऱ्या निसर्ग देवतेच्या आयुष्यासाठी व तिचे पावित्र्य जपण्यासाठी तिचे पूजन या निमित्ताने केले जाते. अरण्य षष्ठी व जागतिक योग दिनाचे औचित्य साधत सिल्लोड येथील पर्यावरण संवर्धक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सह-कार्यवाह डॉ. संतोष पाटील यांनी मोढा बुद्रुक जवळील गायरानवाडी शाळेच्या प्रांगणात दुर्मीळ होत असलेले हिरडा, बेहडा व आवळा या त्रिफळा वृक्षांचे रोपण केले.

विद्यार्थ्यांचे निसर्ग रक्षणात योगदान असावे, म्हणून विद्यार्थी व शालेय समिती मार्गदर्शक गणेश पा. ढोरमारे, गणेश हावळे, कैलास ढोरमारे, मुख्याध्यापक संदीप मोरे, शिक्षिका प्रेमलता जाधव,



अंगणवाडी सेविका राणी सोनगीरे, उज्वला राऊत यांच्या हस्ते हे रोपण करण्यात आले व त्यांनाच संगोपनाचे दायित्व देण्यात आले. शाळेतील वेदिका ढोरमारे या विद्यार्थिनीने अरण्य देवतेची वेषभूषा साकारली. डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग देवतेचे महत्त्व पटवून देऊन शासन निर्देशानुसार शाळेत हरित सेनेची स्थापना केली. आयुर्वेदात त्रिफळाचे शेकडो फायदे सांगितले आहेत. मुख्याध्यापक संदीप मोरे व शिक्षिका प्रेमलता जाधव यांनी हा उपक्रम यशस्वी करून 'माझी शाळा - हरित शाळा' बनवण्याचा निर्धार व्यक्त केला.

**•वनविभागाने हिरडा लागवडीस प्राधान्य द्यावे•**

**या उपक्रमादरम्यान डॉ. संतोष पाटील म्हणाले की, "हिरडा आता संकटात आला आहे. हा अत्यंत महत्त्वाचा वृक्ष असून त्याची कोवळी फळे धनेशसह अनेक पक्षी खातात. मात्र, पक्व हिरड्याचे बाह्य आवरण अत्यंत टणक असते; ते फळ निसर्गतः जमिनीत रुजून नवीन रोप उगवणे अत्यंत कठीण असते. सारंग कुळातील हरिण वर्गीय 'भेकर' हे शाकाहारी प्राणी हिरड्याची पक्व फळे खातात. त्यांच्या पोटातील जठराम्ल त्यास मृदू बनवते व त्यांच्या विष्टेतून बाहेर आलेले बीज जमिनीतील भेगा-खाचांत पडले की नवीन रोप निसर्गात रुजतात. शिकारीमुळे भेकरांची संख्या प्रचंड कमी झाली असून, हिरडा रोपनास वनविभागाने प्राधान्य द्यावे."**

**-डॉ.संतोष पाटील**
**अभिनव प्रतिष्ठान**
**सिल्लोड**

# मराठी 'बालभारती' इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकात रोहन बहिर व प्राचार्य केशव भांगे यांचा समावेश

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे.यांनी चालू शैक्षणिक वर्ष २९२६-२७ पासून शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे, नव्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार मराठी 'बालभारती 'इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकात, लेखक दिलीप फलटणकर यांच्या "धाडसी रोहन" या पाठाचा समावेश केला आहे.

बीड जिल्ह्यातील राजुरी (नवगण) येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या चिं.रोहन रामचंद्र बहिर या विद्यार्थ्याने गावातील दुथडी वाहणाऱ्या नदीच्या मोठा पुरात, धुणे धुतांना वाहून जाणाऱ्या 'छायाबाई गायकवाड' या महिलेचे प्राण वाचविले होते. त्याने दाखविलेल्या धाडसाचे, शौर्याचे, साहस आणि प्रसंगावधान या शाश्वत गुणाचे कौतुक म्हणून, रोहन शिकत असलेल्या 'गजानन महाविद्यालयाचे तत्कालीन' प्राचार्य केशव



भांगे' यांनी विद्यालयात, रोहनचा भव्य सत्कार करून त्याच्या शौर्याचे व धाडसाचे कौतुक केले. आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, माजी कॅबिनेट मंत्री जयदत्त(अण्णा) क्षीरसागर साहेबांनी चिं.रोहन बहिर आपल्या जन्मभूमीतील व शिक्षण संस्थेतील विद्यार्थी असल्याने,त्याचा सत्कार व कौतुक करून त्याच्याबद्दल अभिमान व्यक्त केला. बीड जिल्ह्यातील वृत्तपत्रात रोहनची फोटो सहित बातमी प्रकाशित झाली. रोहनच्या शौर्याची माहिती संपूर्ण देशाला व्हावी म्हणून माननीय जयदत्त (अण्णा)क्षीरसागर साहेब व प्राचार्य केशव भांगे सर, यांनी शासकीय पातळीवर पाठपुरावा केला.त्यामुळे सन-२०२३ ला देशाचे 'पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब'यांच्या हस्ते, चिं.रोहन रामचंद्र बहिर, या विद्यार्थ्याला



विधानभवनात,"पंतप्रधान राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार" प्रदान करण्यात आला. ही विशेष बाब म्हणून मराठी 'बालभारती' इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकातील बाराव्या प्रकरणात राजुरी(नवगण)येथील गजानन विद्यालयाचा विद्यार्थी रोहन रामचंद्र बहिर व तत्कालीन प्राचार्य केशव भांगे साहेब यांचाही समावेश झाला आहे. तेव्हा बीड जिल्ह्याचा, धाडसी रोहनच्या पराक्रमाचा व त्याच्या कौतुकाचा महाराष्ट्रातील सर्व शाळेतील इयत्ता सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागणार आहे.

# सिल्लोडमध्ये शिवसेनेचा ६० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** शिवसेनेचा ६० वा वर्धापन दिन सिल्लोड शहरात उत्साहात साजरा करण्यात आला . यानिमित्त शहरातील वंदनीय हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकावर आयोजित अभिवादन कार्यक्रमास आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना उजाळा दिला. शिवसेनेच्या ६० वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेत पक्षाच्या वाटचालीतील योगदानाचे स्मरण करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले, "शिवसेना ही सामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारी संघटना आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी घेतलेले लोककल्याणकारी



निर्णय तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करावे."

याप्रसंगी "जय भवानी, जय शिवाजी", "शिवसेना पक्षाचा विजय असो", "वंदनीय बाळासाहेब ठाकरे", "धर्मवीर आनंद दिघे" तसेच उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.या सोहळ्यास नगराध्यक्ष अब्दुल समीर सत्तार , उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर, माजी सभापती रामदास पालोदकर, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेविका राजश्री निकम, शहराध्यक्ष मेघा शाह, पंचायत समिती सदस्य निजाम पठाण, शिवसेना शहरप्रमुख मनोज झंवर, माजी उपनगराध्यक्ष विनोद मांडवे, युवासेना पदाधिकारी शिवा टोम्पे, नगरसेवक सुधाकर गायकवाड, जितू आरके, अशोक बनसोड, ज्ञानेश्वर कुदळ, सुनील लांडगे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन नरेंद्र बापू पाटील, संचालक शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, अनिल पालोदे, रमेश ठाकूर, रवी गायकवाड, संतोष घाडगे, विजय खाजेकर, प्रफुल्ल होणे, आशिष कुलकर्णी, गणेश डोईफोडे, संदीप हाडोळे, फईम पठाण, जगन्नाथ कुदळ, कृष्णा वाघ, आत्माराम अग्रवाल, भाऊराव दुधे, गणेश शेलार, आनंद शिरसाट, गणेश बावस्कर, सुनील काळे, सिताराम कुदळ, देवराव भाग्यवंत, विनोद पैठणकर, मनोज चंदनसे यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालेगाव तालुक्यात गुटखा विक्रीचा सुळसुळाट; बंदी असूनही ग्रामीण भागात खुलेआम धंदा?

## तुकाराम मुंढे यांच्या धडक मोहिमेची मालेगावातही गरज ; संबंधित यंत्रणा कारवाई करणार का ?

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** मालेगाव राज्यात गुटखा विक्री व साठवणुकीवर बंदी असताना देखील वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात, विशेषतः ग्रामीण भागात, गुटख्याची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे. अनेक किराणा दुकाने, पानटपऱ्या व इतर ठिकाणी लपून-छपून गुटखा विक्री होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

राज्यभर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विक्रेत्यांविरोधात धडक कारवाया सुरू केल्या असून अनेक ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त करण्यात आला आहे. मात्र, या कारवायांचा प्रभाव मालेगाव तालुक्यात कितपत दिसून येतो, याबाबत नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, ग्रामीण भागात काही ठिकाणी "नजर" नावाच्या पुडीची विक्री सुरू असल्याचे सांगितले जात आहे. पूर्वी तीन रुपयांना मिळणारी ही पुडी आता सात रुपयांपर्यंत विकली जात असल्याची माहिती समोर येत आहे. गुटखा बंदी असूनही अशा प्रकारे वाढलेल्या दराने विक्री होत असल्याने संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याहूनही गंभीर बाब म्हणजे ग्रामीण भागात अनेक वेळा लहान मुलांना किराणा दुकानातून गुटखा आणण्यासाठी पाठवले जाते. काही ठिकाणी दुकानदार कोणताही विचार न करता किंवा अल्पवयीन मुलांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार न करता त्यांच्या हातात नजर, विमल, वाह पराग यांसारख्या पुड्या देत असल्याचे सांगितले जाते. ही बाब अत्यंत चिंताजनक असून भविष्यातील पिढी व्यसनाच्या गर्तेत ढकलली जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

स्थानिक पातळीवर अशीही चर्चा आहे की काही विक्रेते कारवाई टाळण्यासाठी दुकानात कमी प्रमाणात माल ठेवतात आणि उर्वरित गुटखा घरात, शेतातील एखाद्या आडवळणाच्या ठिकाणी किंवा इतर सुरक्षित जागी लपवून ठेवतात. त्यामुळे अचानक धाड टाकली तरी मोठा साठा हाती लागत नसल्याचे बोलले जाते. अशा परिस्थितीत संबंधित यंत्रणांनी गुप्त माहितीच्या आधारे अधिक प्रभावी कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष वेशांतर करून किंवा गुप्त पथकांमार्फत किराणा




दुकाने व पानटपऱ्यांवर तपासणी केल्यास वास्तव समोर येऊ शकते. ग्रामीण भागातील अनेक दुकानांमध्ये गुटखा सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा असून याकडे अन्न व औषध प्रशासन, पोलीस विभाग तसेच महसूल प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

नागरिकांमध्ये अशी भावना आहे की एखाद्या वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर अधिकारी तपासणीसाठी पोहोचतात; मात्र त्यानंतर पुढे काय कारवाई होते, याबाबत पारदर्शकता असावी. प्रशासनाने नियमबाह्य गुटखा विक्रीवर कठोर आणि निष्पक्ष कारवाई करून दोषींना कायद्याच्या चौकटीत आणणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

गुटखा विक्रीवर बंदी असताना देखील मालेगाव तालुक्यात हा व्यवसाय सुरू असल्याच्या चर्चेमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. संबंधित विभागांनी संयुक्त मोहीम राबवून संशयित ठिकाणी धाडी टाकाव्यात, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि गुटखामुक्त मालेगावसाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

प्रश्न केवळ गुटखा जप्तीचा नाही, तर येणाऱ्या पिढीच्या आरोग्याचा आहे. युवा वर्ग व्यसनमुक्त राहून शिक्षण, रोजगार आणि सकारात्मक कार्याकडे वळावा यासाठी गुटखाबंदीची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर सुरू केलेल्या धडक मोहिमेच्या धर्तीवर वाशिम जिल्हा आणि मालेगाव तालुक्यातही ठोस व सातत्यपूर्ण कारवाई होईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

मालेगाव तालुक्यात सुरू असलेल्या कथित गुटखा विक्रीकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देणार का, आणि बंदीची प्रभावी अंमलबजावणी होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पालोदकर महाविद्यालयात 'माता-पालक मेळावा'

## मुलांच्या घडणीत आईचे योगदान श्रेष्ठः सलमा शेख

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात २० जून २०२६ रोजी महिला पालकांसाठी 'माता-पालक मेळावा' आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे व उपस्थित मातांच्या हस्ते सरस्वती आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.




या मेळाव्यात ५० हून अधिक माता-पालक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांचा अभ्यास, गृहपाठ, पोषण आहार, शालेय सहल, नवीन उपक्रम आणि आगामी शैक्षणिक वर्षातील पालकांच्या अपेक्षांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच विद्यार्थिनींचे आरोग्य, सकस आहार आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. अनेक मातांनी आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर चर्चा करत समस्या मांडल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप कानडजे मार्गदर्शन करताना म्हणाले की, "माता ही मुलांची पहिली शिक्षिका असते, त्यामुळे पालकांच्या सक्रिय सहभागानेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे." प्रमुख पाहुण्या सलमा शेख यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "मुलांवर सुसंस्कार करण्यापासून ते त्यांच्या अभ्यासातील अडचणी सोडवण्यापर्यंत आईचे योगदान अनन्यसाधारण आहे." शिक्षिका महादेवी ठवरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळेसोबतच पालकांनी घरीही मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका जयश्री चापे यांनी केले.

शाळेच्या या उपक्रमाचे मातांनी स्वागत करून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# अनधिकृत पार्किंगमुळेच मयूर पाटीलचा बळी; "रस्ते मोकळे करा अन्यथा रस्त्यावर उतरणार

## पागोटे ग्रामस्थांचा प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** पागोटे आणि नवघर परिसरात मोठ्या प्रमाणात उभारण्यात आलेल्या कंटेनर यार्ड्समुळे आणि त्यांच्या अंधाधुंद अनधिकृत पार्किंगमुळे निष्पाप नागरिकांचे बळी जाण्याचे सत्र सुरूच आहे. या गंभीर समस्येची दखल घेत नवघर ते धुतुम मार्गावरील सर्व बेकायदेशीर पार्किंग तात्काळ हटवण्यासाठी पागोटे ग्रामस्थांनी प्रशासनाला १५ दिवसांचा कडक अल्टिमेटम दिला असून या मुदतीत रस्ते मोकळे न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या संदर्भात वाहतूक शाखेचे माननीय वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे आणि उरण पोलीस ठाण्यात ग्राम सुधार सामाजिक विकास मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने लेखी निवेदन सादर करण्यात आले.




या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंना कंटेनर वाहतुकीच्या गाड्या बेकायदेशीरपणे पार्क केल्या जात असल्याने हा रस्ता 'डेथ ट्रॅप' बनला आहे. दोन महिन्यांपूर्वी पागोटे गावातील एका तरुणाचा भीषण अपघात होऊन त्याला कायमचे अपंगत्व आले, तर धुतुम गावातील एका तरुणाला यात आपला जीव गमवावा लागला होता. त्यातच १५ जून रोजी डीआरटी कंपनीजवळ रस्त्याकडेला उभ्या असलेल्या अनधिकृत कंटेनरमुळे मोठीजुई गावातील मयूर पाटील या तरुणाचा भीषण अपघात होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. या ताज्या दुर्घटनेमुळे संबंधित कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ग्रामपंचायत पागोटे या गंभीर समस्येबाबत सन २०१८ पासून सातत्याने पत्रव्यवहार आणि पाठपुरावा करत आहे, मात्र प्रशासनाने याकडे नेहमीच दुर्लक्ष केले आहे. मुख्य रस्त्यावरून मोठी कंटेनर वाहतूक होत असल्याने शालेय विद्यार्थी, नोकरदार आणि पागोटे ग्रामस्थांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे अनेक कंटेनर चालक गाड्यांमध्येच मुक्काम करतात व्यसनाच्या आहारी जाऊन गाड्या बाजूला घेण्यास सांगणाऱ्या ग्रामस्थांची वाद घालतात त्यामुळे येथे कायदा व सुव्यवस्थेचे वातावरण निर्माण झाले आहे.

हे निवेदन स्वीकारताना वाहतूक शाखेचे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे हजर होते .आणि त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन या समस्येचे तात्काळ निराकरण करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी ग्राम सुधार सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष मनोहर पाटील, सरपंच कुणाल पाटील, माजी ग्रामपंचायत अध्यक्ष मेघनाथ तांडेल ,उपाध्यक्ष आशिष तांडेल, सेक्रेटरी रमेश पाटील ,खजिनदार कमलाकर ठाकूर यांच्यासह पागोटे ग्रामपंचायत सदस्य पदाधिकारी आणि नवघर पागोटे परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाने १५दिवसांच्या आत ठोस कारवाई करून रस्ते मोकळे केले नाहीत तर संपूर्ण ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील असा इशारा यावेळी देण्यात आला.

# विदर्भाच्या विकासासाठी आयुष्यभर झटणारे माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे, अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि जनहितासाठी अखंड लढणारे माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने विदर्भाच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेत हळहळ व्यक्त होत असून विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.




अमरावती पदवीधर मतदारसंघाचे सलग पाच वेळा प्रतिनिधित्व करताना प्रा. देशमुख यांनी लोकप्रतिनिधी कसा असावा, याचा आदर्श निर्माण केला. विधिमंडळातील त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि तथ्याधारित भाषणांमुळे त्यांची ओळख एक प्रभावी व जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून निर्माण झाली होती. विविध विषयांचा सखोल अभ्यास करून आकडेवारीच्या आधारे शासनाचे लक्ष वेधण्याची त्यांची शैली विशेष ठरली.

विदर्भातील सिंचन, पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण आणि भौतिक अनुशेष यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला. एखादा प्रश्न केवळ मांडण्यापुरता मर्यादित न राहता तो मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. त्यामुळे विदर्भाच्या विकासासाठी लढणारा एक खंबीर आवाज म्हणून त्यांना सर्वपक्षीय आदर प्राप्त झाला होता.

प्रा. देशमुख यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, शिस्त आणि जनसेवेची मूल्ये जपली. विधिमंडळाच्या कामकाजातील त्यांची तयारी, विषयांवरील प्रभुत्व आणि लोकहितासाठीची निष्ठा यामुळे अनेक नवोदित लोकप्रतिनिधींना त्यांच्याकडून प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या कार्यातून लोकशाही व्यवस्थेतील जबाबदार लोकप्रतिनिधित्वाचे दर्शन घडत असे.

विदर्भाच्या प्रश्नांबाबत त्यांची असलेली तळमळ आणि संघर्षाची भूमिका कायम स्मरणात राहील. त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत कोणत्याही पदापेक्षा जनतेच्या प्रश्नांना अधिक महत्त्व दिले. त्यामुळेच ते केवळ एक राजकारणी नव्हे, तर विदर्भाच्या विकासासाठी झटणारे विचारवंत आणि जननेते म्हणून ओळखले जात होते.

प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाचे पर्व संपुष्टात आले आहे. त्यांच्या कार्याचा वारसा आणि विदर्भाच्या विकासासाठी त्यांनी दिलेला लढा भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

प्रा. बी. टी. देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत असून त्यांच्या कुटुंबीयांच्या, मित्रपरिवाराच्या आणि असंख्य अनुयायांच्या दुःखात संपूर्ण विदर्भ सहभागी झाला आहे.

**ॐ शांती!**

# १९ जून जागतिक सिकलसेल दिवस देगाव येथे साजरा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी रणजीतसिह. ठाकूर :** डॉ.ठोंबरे सर जिल्हा आरोग्य अधिकारी वाशिम व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.डाखुरे सर ,1तसेच जिल्हा सिकलसेल समन्वयक श्री. पुरुषोत्तम इंगोले सर यांच्या मार्गदर्शनाखाली आज लिंगा उपकेंद्र अंतर्गत देगाव येथे 19 जून सिकलसेल दिवस साजरा करण्यात आला व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले श्री.भारत पारवे तालुका सिकलसेल सहाय्यक यांनी मार्गदर्शन केले व सिकलसेल आजारा विषयी माहिती दिली .

**जाणून घ्या**

सामान्य लाल रक्तपेशी वर्तुळ आकाराची असते व

सिकलसेल लाल रक्तपेशी विळयाच्या आकाराच्या असतात

*लक्षणे*

- ■ अशक्तपणा
- ■ सांधेदुखी, सांधे सुजणे
- ■ शरीर पिवळसर होणे
- ■ असहय वेदना होणे

लहान बालकांना वारंवार जंतुसंसर्ग होणे

**तपासणी**

बोटातून दोन थेंब रक्त घेऊन सोल्युबिलीटी चाचणी केली जाते. ही चाचणी पॉझिटीव्ह असल्यास हिमोग्लेबीन इलेक्ट्रोफोरेसीस चाचणी केली जाते

प्रा. आरोग्य केंद्रामध्ये मोफत चाचणी केली जाते.

**सिकलसेल टाळु शकतो**

सिकलसेल विषयी अचुक माहिती मिळवा

सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमात मोफत रक्त तपासणी (सोल्युबीलीटी टेस्ट व इलेक्ट्रोफोरेसीस) होते. सकलसेल वाहक व ग्रस्त रुग्णास मोफत समुपदेशन, औषधोपचार व संदर्भसेवा उपलब्ध आहेत. सिकलसेल रुग्णांसाठी जिल्हा रुग्णालयात मोफत रक्त संक्रमण करण्यात येते.क्षमताः लग्न ठरविण्यापूर्वी मुलगा व मुलगी दोघांचीही रक्ताची तपासणी करून घ्या.

**असे विवाह टाळाः** १) दोघेही वाहक असतील तर २) एक वाहक व एक ग्रस्त असेल तर ३) दोघेही ग्रस्त असतील तर कारण त्यांच्या होणा या अपत्याला हा आजार होऊ शकतो

१) सर्व सिकलसेल आजारी रुग्णांना फॉलिक ऍसिड गोळया मोफत पुरविणे २) रुग्णांना वेदना नाशक औषधे देणे. ३) जंतुसंसर्ग झाल्यास अँटीबायोटिक देऊन उपचार करणे ४) गुंतागुंतीच्या रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालयात हलविणे.

५) रक्त संक्रमणाची गरज असणा या रुग्णांना जिल्हा रुग्णालयात रक्त संक्रमणाची सोय उपलब्ध करणे

६) सर्व रुग्णालयांना रुग्णांसाठी स्वतंत्र औषधे पुरविण्यात येत आहे. तसेच 1 ते 40 वयोगटातील लाभार्थ्यांची सिकलसेल तपासणी करण्यात आली खालील कर्मचारी यांनी नियोजन केले.

आरोग्य सेविका ,आरोग्य सेवक, आशा स्वयंसेविका इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

# लाल मिरचीतील हे खास तत्व पायांच्या मुंग्या अन् वेदनेपासून देते आराम, संशोधनातून समोर आली माहिती

मधुमेही रुग्णांसाठी न्यूरोपॅथी(नसा कमकूवत होणे) एक मोठी गुंतागुंतीची समस्या आहे ज्यामुळे नेहमी पायांमध्ये अचानक मुंग्या येणे, दाह किंवा सूज येणे किंवा पाय बधीर होतो. या त्रासातून सुटका मिळवण्यासाठी लोक कित्येक घरगुती उपाय करतात. नुकत्याच समोर आलेल्या वैदयकिय संशोधनामध्ये आश्चर्यकारत आणि रंजक माहिती समोर आली आहे. संशोधनानुसार, “लाल मिरच्यांमध्ये आढळणारे एक खास तत्व ‘कॅप्सॅसिन’ (Capsaicin) नसांमधील वेदना शांत करण्यासाठी फायदेशीर ठरू शकते.”

हा दावा जर्नल ऑफ द एसोसिएशन ऑफ फिजिशियन ऑफ इंडिया (JAPI) मध्ये प्रकाशिक एका समीक्षा अहवालात केला आहे. ही समीक्षा अहवाल २२ वैदयकिय संशोधनाचे विश्लेषण केले आहे ज्यामध्ये १८००रुपये अधिक समाविष्ट आहेत.

संशोधनामध्ये आढळून आले आहे की, त्वचेवर लावण्यात येणारे कॅप्सॅसिन(-Capsaicin) औषध नसांशी संबधित वेदनेपासून आराम देऊ शकते. विशेषत: डायबिटिक पेरिफॅरल न्यूरोपॅथी (DPN) आणि पोस्ट हर्पेटिक न्यूराल्जिया (PHN) या प्रकरणांमध्ये फायदेशीर ठरू शकते.

संशोधनानुसार. ०.०७५ टक्के कॅप्सॅसिन क्रीम अधिक प्रभाव होणार आहे. याचा अर्थ असा की, १०० ग्रॅम क्रीम, जेल किंवा लोशनमध्ये मिरीपासून मिळवलेला ०.०७५ ग्रॅम सक्रिय घटक असतो. संशोधनानुसार, त्वचेवर लावलेले कॅप्सायसिन वेदनाशामक औषधाइतकेच प्रभावी आहे. वेदनाशामक औषधांसारखा ही क्रीम वापरताना कोणताही दुष्परिणाम होत नाही.



ज्यांच्या नेतृत्वाखाली या संशोधनाचा आढावा घेण्यात आला, त्या ‘डायबिटीज स्पेशालिटी सेंटर’चे अध्यक्ष डॉ. व्ही. मोहन यांनी सांगितले की, कॅप्सिसिन हा काही नवीन पदार्थ नाही. मिरचीला तिखटपणा देणारा जो सक्रिय घटक असतो, तोच घटक वेदनाशामक बाम आणि मलम (ointments) मध्ये अनेक वर्षांपासून वापरला जात आहे.

डॉ. व्ही. मोहन यांच्या मते, “या नवीन आढाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे मज्जातंतूंच्या वेदनांवर (nerve pain) होणाऱ्या परिणामांबाबतचे वैज्ञानिक पुरावे आता अधिक भक्कम झाले आहेत.”

त्यांनी सांगितले की, कॅप्सिसिन हे केवळ त्वचेची जळजळ निर्माण करणारे एक सामान्य द्रव्य नाही, तर वेदना निर्माण करणाऱ्या मज्जातंतूंवर थेट परिणाम करणारे ते एक उपचार-साधन आहे.

या आढाव्यात असेही दिसून आले की, बाजारात उपलब्ध असलेल्या कमी तीव्रतेच्या उत्पादनांच्या तुलनेत ०.०७५% कॅप्सिसिन असलेले मिश्रण अधिक प्रभावी ठरू शकते.

संशोधनाच्या आढाव्यात डॉ. मंगेश तिवस्कर यांचा समावेश आहे. त्यांच्या मते, सध्या सर्वात प्रभावी डोस डायबेटिक पेरिफेरल न्यूरोपॅथी आणि पोस्ट-हर्पेटिक न्यूराल्जियासाठी उपलब्ध आहेत. पण नसांच्या वेदना इतर अनेक कारणांमुळे होऊ शकतात, जसे की व्हिटॅमिन बीची कमतरता, थायरॉईड विकार, अल्कोहोलमुळे नसांना होणारे नुकसान, केमोथेरपी-प्रेरित न्यूरोपॅथी, नसांवर दाब येण्याच्या समस्या आणि इतर चयापचय व मज्जासंस्थेचे आजार. या परिस्थितीत, रुग्णांना जळजळ, मुंग्या येणे, बधिरता, विजेचा धक्का बसल्यासारखी संवेदना आणि अत्यंत संवेदनशीलता जाणवू शकते. कॅप्सायसिन वेदना जाणवणाऱ्या नसांच्या टोकांवर कार्य करत असल्यामुळे, ते इतर नसांच्या टोकांसाठी देखील उपयुक्त ठरू शकते.

लाल मिरची खाल्ल्याने डायबेटिक न्यूरोपॅथी बरी होऊ शकते का?

मिरच्या थेट पायांवर लावू नका. संशोधनात, लाल मिरच्या थेट जास्त प्रमाणात खाल्ल्याने आराम मिळाल्याचे नोंदवले गेले नाही. मिरची थेट त्वचेवर किंवा मधुमेहींच्या पायाच्या अल्सरवर लावल्यास परिस्थिती खूप धोकादायक बनू शकते. डॉक्टरांच्या मते, वैज्ञानिक प्रयोगशाळेत मिरीमधून ‘कॅप्सायसिन’ हा पदार्थ काढून एका निश्चित आणि सुरक्षित प्रमाणात (०.०७५%) वैद्यकीय क्रीम, जेल किंवा पॅचेस तयार केले जातात. याचा वापर केवळ डॉक्टरांच्या देखरेखीखाली आणि सल्ल्यानुसारच केला जातो.

कॅप्सिसिन क्रीम लावताना घ्यावयाची खबरदारी

तज्ज्ञांनी सांगितले आहे की, “हे क्रीम किंवा जेल फक्त बधिर झालेल्या किंवा मुंग्या आलेल्या भागावर किंवा स्वच्छ त्वचेवरच लावावे. ते कोणत्याही उघड्या जखमेवर, कापलेल्या त्वचेवर किंवा फोडांवर लावू नका.”

आपले डोळे आणि चेहरा सुरक्षित ठेवा. क्रीम लावल्यानंतर लगेचच आपले हात साबणाने स्वच्छ धुवा. क्रीमने चेहरा, नाक किंवा हातांना स्पर्श करू नका.

# पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज)** : मानवी जीवनाच्या समृद्धीसाठी आणि समाजाच्या शाश्वत प्रगतीसाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या निस्पृह कर्तृत्वाचा आदर करणे,हे समाज म्हणून आमचे परमकर्तव्य आहे.याच उदात्त भावनेतून 'शिर्के जनकल्याण प्रतिष्ठान' अविरतपणे कार्यरत आहे.चालू वर्षातही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व मार्गदर्शक कार्य करणाऱ्या आदरणीय व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यासाठी प्रतिष्ठान सज्ज झाले असून,राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी अत्यंत आदराने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.आपण किंवा आपल्या परिचयातील सुजाण व्यक्तीने शैक्षणिक,सामाजिक,क्रीडा,वैद्यकीय/आरोग्य, कला,सांस्कृतिक,पर्यावरण,रोजगार निर्मिती,पत्रकारिता,कृषी,उद्योग,सहकार,लोकप्रतिनिधी किंवा महिला व युवा सशक्तीकरण या क्षेत्रांत आपले अमूल्य योगदान दिले असल्यास आपले प्रस्ताव सादर करावेत.हे पुरस्कार वयाचे बंधन न ठेवता केवळ व्यक्तीच्या कर्तृत्वाला व समर्पणाला पाहून प्रदान केले जातात.निवड झालेल्या सन्माननीय मान्यवरांना आकर्षक स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र सोबत श्रीफळ आणि स्नेहपुष्प देऊन अत्यंत सोहळापूर्वक सन्मानित करण्यात येईल.आपल्या प्रस्तावासोबत केवळ आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित (Attested) झेरॉक्स प्रती जोडाव्यात. (कृपया मूळ कागदपत्रे जोडू नयेत,तसेच सादर केलेली कागदपत्रे प्रतिष्ठानकडे जतन केली जातील,ती परत मिळणे शक्य होणार नाही याची नोंद घ्यावी).प्रस्तावासोबत आपला सविस्तर परिचय (बायोडाटा),तसेच एक फोटो अर्जावर चिकटवून व एक फोटो सोबत जोडून पाठवावा.आपल्या कार्यास अधिक बळ देण्यासाठी पत्रकार,शिक्षक,मुख्याध्यापक,संपादक,सरपंच किंवा प्रतिष्ठित व्यक्तींचे शिफारसपत्र जोडल्यास उत्तम,मात्र ते बंधनकारक नाही.पुरस्कारासाठी अंतिम निवड करण्याचा निर्णय प्रतिष्ठानच्या निवड समितीकडे सुरक्षित राहील.आपले सन्माननीय प्रस्ताव स्वीकृत करण्याची अंतिम तारीख ५ जुलै (सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत) निश्चित करण्यात आली आहे.सादर प्रस्तावासाठी प्रवेश सहकार्य शुल्क ₹ २,०००/- असून,ते मोबाईल क्रमांक 8898334580 वर व्हाट्सॲप किंवा स्कॅनिंग कोड/पेटीएमद्वारे सुलभतेने जमा करता येईल.निवड झालेल्या मान्यवरांना दूरध्वनी अथवा पत्राद्वारे अत्यंत आदराने कळविले जाईल.

संपर्क व पत्रव्यवहाराचा पत्ता:

ॲड.सुनील भार्गवराम शिर्के.,संस्थापक/अध्यक्ष: शिर्के जनकल्याण प्रतिष्ठान: स्वप्न को-ऑप.हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. १०७/३, सेक्टर-१, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,चारकोप,कांदिवली (पश्चिम),मुंबई - ४०० ०६७. भ्रमणध्वनी (WhatsApp): 8898334580 / 7738300157. ईमेल:shirkejankalyan-pratishthan@gmail.com /sbshirke63@gmail.com

# भविष्यातील संरक्षण सज्जतेसाठी देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल - संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

## नागपूर संरक्षण उत्पादन क्षेत्रातील महत्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : देशाला भविष्यात संरक्षणसज्ज ठेवायचे असेल तर संरक्षण क्षेत्राशी संबंधित अत्यावश्यक गरजांवर स्वतःचे नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टीने यंत्र इंडियाचा अत्याधुनिक ॲल्युमिनिअम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्प भारताचे आयात अवलंबित्व कमी करून देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने अत्यंत महत्त्वाचा ठरेल. या प्रकल्पाच्या माध्यमातून संरक्षण, एरोस्पेस, विमाननिर्मिती, क्षेपणास्त्र कार्यक्रम, रेल्वे आणि इतर धोरणात्मक क्षेत्रांसाठी आवश्यक असलेल्या उच्च दर्जाच्या ॲल्युमिनियम मिश्रधातूंच्या निर्मितीला मोठी चालना मिळेल आणि देशाच्या संरक्षण क्षमतेत मोठी भर पडेल, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज येथे व्यक्त केला.

यंत्र इंडिया लिमिटेडच्या अंबाझरी आयुध निर्माणीतील १० हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक ॲल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेस प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह बोलत होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीव कुमार, संयुक्त सचिव गरिमा भगत, यंत्र इंडिया लिमिटेडचे सीएमडी विजय कुमार अय्यर यांच्यासह संरक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले, हा प्रकल्प म्हणजे आयातीवर अवलंबून राहण्याऐवजी देशांतर्गत उत्पादनक्षमतेला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. संरक्षण प्रणाली, क्षेपणास्त्र कार्यक्रम, अंतराळ संशोधन, विमान उद्योग, रेल्वे आणि इतर धोरणात्मक क्षेत्रांसाठी आवश्यक असलेले मोठ्या आकाराचे व गुंतागुंतीचे ॲल्युमिनियम मिश्रधातू घटक या प्रकल्पातून तयार करता




येणार आहेत. त्यामुळे महत्त्वाच्या अशा ॲल्युमिनियम घटकांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन देशांतर्गत पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आधुनिक लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि अंतराळ कार्यक्रमांसाठी हलके, मजबूत आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थिती सहन करू शकणारे धातू आवश्यक असतात. अशा धातूंची निर्मिती विशेष प्रक्रियेद्वारे केली जाते. त्यामुळे हा प्रकल्प संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे नमूद करून संरक्षणमंत्री राजनाथसिंह म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या यशात देशात विकसित झालेल्या संरक्षण उपकरणांची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. मोठ्या यंत्रणांची खरी ताकद हजारो लहान-मोठ्या घटकांमध्ये दडलेली असते. ॲल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेसमुळे या क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल अधिक वेगाने होईल, असे ते म्हणाले.

संरक्षण उत्पादन क्षेत्रातील देशाच्या प्रगतीचा आढावा घेताना राजनाथ सिंह यांनी सांगितले की, २०१४ मध्ये देशांतर्गत संरक्षण उत्पादन सुमारे ४६ हजार कोटी रुपये होते. २०२५-२६ या आर्थिक वर्षात विक्रमी १.७८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. संरक्षण क्षेत्रातील निर्यातही २०१४ मधील एक हजार कोटींवरून वाढून ३८ हजार ४२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. पुढील दोन ते तीन वर्षांसाठी निश्चित केलेले तीन लाख कोटी रुपयांचे संरक्षण उत्पादन आणि ५० हजार कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीचे उद्दिष्ट नियोजित वेळेपूर्वीच साध्य होईल, असा विश्वास संरक्षणमंत्र्यांनी व्यक्त केला.

**नागपूर संरक्षण उत्पादन क्षेत्रातील महत्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हा प्रकल्प आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. संरक्षण क्षेत्रात भारताची वाढती ताकद जगभरात मान्य होत असून केंद्र सरकारच्या धोरणांमुळे देश जागतिक संरक्षण उत्पादन निर्यातदार म्हणून उदयास येत आहे. या अत्याधुनिक प्रकल्पामुळे नागपूर आणि विदर्भ संरक्षण उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होईल. विदर्भात विशेषतः नागपूरचा परिसर हा 'डिफेंस मॅनुफॅक्चरिंग इकोसिस्टिम'मध्ये देशाचे एक महत्वाचे अंग म्हणून विकसित होत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

आत्मनिर्भरतेकडे देशाने एक सक्षम पाऊल टाकले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत असे दोन मंत्र आपल्याला दिले आहेत. विकसित भारताकडे वाटचाल करायची असल्यास आत्मनिर्भर भारत विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या देशाने आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल सुरू केली असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आज संपूर्ण जग आपल्या देशाची प्रगती पाहून आश्चर्यचकित झाले आहे. भारताने संरक्षण क्षेत्रात अत्यंत कमी वेळात प्रगती केली असून संरक्षण क्षेत्रातील एक महत्वाचा उत्पादक देश झाला आहे. विशेषतः ऑपरेशन सिंदूरमध्ये साऱ्या जगाने देशाची सामरिक क्षमता पाहिली आहे. हा नवा भारत असून पूर्ण क्षमतेने व आत्मनिर्भरतेने उभा असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

यंत्र इंडिया लिमिटेडचे सीएमडी विजय कुमार अय्यर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमादरम्यान ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेसची माहिती देणारी ध्वनिचित्रफित दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे आभार अंबाझरी आयुध निर्माणीचे कार्यकारी संचालक अजयकुमार येरपुडे यांनी मानले.

---

# राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना

## शासकीय पडीक जमिनी केवळ १ रुपया वार्षिक भाडेपट्ट्याने; महिला बचत गटांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून ही योजना राबविण्यात येणार असून, राज्यातील शासकीय पडीक जमिनी केवळ १ रुपया वार्षिक नाममात्र भाडे आकारून पात्र महिला बचत गट, ग्रामसंघ तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांच्या गटांना भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहेत.

या योजनेअंतर्गत शासकीय पडीक जमिनींवर चारा, बांबू,



नर्सरी तसेच अपारंपरिक ऊर्जा स्रोतांसाठी आवश्यक कच्च्या मालाची लागवड करता येणार आहे. चारा लागवडीसाठी ३ वर्षांचा, तर बांबू लागवडीसाठी १० वर्षांचा भाडेपट्टा देण्यात येईल. चांगली कामगिरी करणाऱ्या गटांना नियमानुसार भाडेपट्ट्याचे नूतनीकरणही करता येणार आहे.

योजनेनुसार १० महिला सदस्य असलेल्या बचत गटांना १ हेक्टर, २० सदस्य असलेल्या महिला संस्थांना २ हेक्टर, तर ग्रामसंघांना ५ हेक्टरपर्यंत शासकीय जमीन उपलब्ध होणार आहे. संबंधित जिल्हाधिकारी व तालुकास्तरीय समितीमार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.महिला बचत गटांना शेतीपूरक व्यवसायातून उत्पन्नाचे शाश्वत साधन उपलब्ध करून देणे, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करणे आणि शासकीय पडीक जमिनींचे अतिक्रमणापासून संरक्षण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

योजनेसाठी महिला बचत गट एमएसआरएलएम (उमेद) अंतर्गत नोंदणीकृत असणे, गटाची किमान ३ वर्षांपूर्वी नोंदणी झालेली असणे, बँक खाते किमान १ वर्ष सक्रिय असणे आणि वार्षिक उलाढाल किमान ₹५० हजार असणे आवश्यक आहे. पशुपालन किंवा शेतीचा अनुभव असलेल्या महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाणार आहे.राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे ग्रामीण महिलांना आर्थिक स्वावलंबनाची नवी संधी मिळणार असून, शासकीय पडीक जमिनींचा उत्पादक वापर वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# विक्रोळी पार्कसाईट येथे दोन दिवसांपूर्वी बनवलेल्या रस्त्यावरील गटार खचले ; ट्रक अडकल्याने संताप

**दैनिक युवक आधार**

**विक्रोळी,(केतन भोज)** : वॉर्ड क्र.१२३ मधील विक्रोळी पार्कसाईट परिसरात संदेश विद्यालय शाळेच्या शेजारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागामार्फत दोन दिवसांपूर्वी तयार करण्यात आलेल्या रस्त्यावरील गटार अचानक खचल्याची घटना समोर आली आहे.गटार खचल्यामुळे त्यामध्ये एक ट्रक अडकून बसल्याने परिसरात खळबळ उडाली असून कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार,संबंधित रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले होते.मात्र अवघ्या दोन दिवसांतच रस्त्यालगतचे गटार खचल्याने बांधकामाच्या दर्जाबाबत शंका व्यक्त केली जात आहे. महापालिकेच्या निधीतून करण्यात आलेल्या कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले का,याची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.गटार खचल्यामुळे एक मालवाहू ट्रक त्यात अडकून बसला.सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठी दुर्घटना घडू शकली असती.या घटनेमुळे काही



काळ वाहतुकीवर परिणाम झाला आणि नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.स्थानिक रहिवाशांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.तसेच वॉर्ड क्र.१२३ मधील अलीकडे करण्यात आलेल्या रस्ते व गटार कामांचे तांत्रिक ऑडिट करण्यात यावे,अशीही मागणी पुढे येत आहे.अवघ्या दोन दिवसांत गटार खचल्याच्या या घटनेमुळे महापालिकेच्या

**"मनपा एन विभागाकडून नुकतेच रस्ता व गटाराचे काम पूर्ण झाल्याचे सांगितले जात असताना अवघ्या दोन दिवसांत गटार खचणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.यामुळे कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.सुदैवाने मोठी दुर्घटना टळली,मात्र भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित कामाची तातडीने चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तसेच कंत्राटदारावर कारवाई करावी.तसेच वॉर्ड क्र.१२३ मधील सर्व नव्याने झालेल्या रस्ते व गटार कामांचे तांत्रिक ऑडिट करण्यात यावे,अशी आमची मागणी आहे."**

**- संतोष गांजले,**
**सामाजिक कार्यकर्ते**

विकासकामांच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून,करदात्यांच्या पैशातून होणाऱ्या कामांमध्ये पारदर्शकता आणि गुणवत्ता राखली जाते का,असा सवाल उपस्थित केला जात आहे.

---

# माहितीचा हक्क की कागदी अडथळ्यांचे जाळे ? माहितीचा अधिकार नियम २०२६ वादाच्या भोवऱ्यात

माहितीचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील सर्वात प्रभावी आणि महत्त्वाचा कायदा मानला जातो.शासनाच्या कामकाजात पारदर्शकता,उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ लागू करण्यात आला.मात्र महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६' मधील काही तरतुदींमुळे नागरिक,सामाजिक कार्यकर्ते आणि माहिती अधिकार अभ्यासकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

**माहिती मागण्यासाठी प्रयोजन सांगणे बंधनकारक**

नव्या नियमांमधील सर्वात चर्चेचा विषय म्हणजे माहिती मागताना त्या माहितीची आवश्यकता किंवा प्रयोजन नमूद करण्याची अट घालण्यात आली आहे.माहिती अधिकार कायद्याच्या मूळ संकल्पनेनुसार नागरिकांना माहिती का हवी आहे,याचे कारण देण्याची गरज नसते.कारण माहिती ही सार्वजनिक संपत्ती मानली जाते. त्यामुळे प्रयोजन सांगण्याची सक्ती केल्यास अनेक नागरिक माहिती मागण्यापासून परावृत्त होऊ शकतात. यामुळे कायद्याच्या मूळ उद्देशालाच धक्का बसण्याची शक्यता आहे.

**अर्ज शुल्कात वाढ**

माहिती अधिकार अर्जासाठी शुल्क ₹१० वरून थेट ₹३० करण्यात आले आहे.अनेक सामान्य नागरिक,विद्यार्थी,सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामीण भागातील नागरिक ही शासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करतात.या शुल्कवाढीमुळे आता आर्थिक अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.माहिती मिळविण्याची प्रक्रिया स्वस्त आणि सर्वसामान्यांना परवडणारी असावी,हीच कायद्याची भावना आहे.

**माहितीच्या प्रतींसाठी वाढीव शुल्क**

माहितीचे प्रति पृष्ठ आधी शुल्क ₹२ होते ते आता थेट शुल्क ₹५ आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.यामुळे मोठ्या प्रमाणावर माहिती मागितल्यास नागरिकांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागू शकतो.माहिती मिळविण्याचा खर्च वाढल्यास अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये माहिती मागण्याचे प्रमाण घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**१५० शब्दांची मर्यादा आणि एका अर्जात एकच विषय**

नियमांमध्ये अर्जासाठी १५० शब्दांची मर्यादा आणि एका अर्जात एकच विषय घेण्याची अट घालण्यात आली आहे.प्रत्यक्षात अनेक विषय परस्पर संबंधित असतात.अशा वेळी वेगवेगळे अर्ज करावे लागल्यास नागरिकांचा वेळ,श्रम आणि पैसा अधिक खर्च होणार आहे.ही अट माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेला अधिक गुंतागुंतीची बनवू शकते.

**ओळखपत्राची प्रत जोडण्याची सक्ती**

अर्जासोबत स्वयं-साक्षांकित नागरिकत्व ओळखपत्र जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांच्या गोपनीयतेबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात.माहिती अधिकार कायद्याचा उद्देश प्रक्रिया सुलभ करणे हा आहे.अतिरिक्त कागदपत्रांची अट घातल्यास अनेक नागरिकांसाठी अर्ज प्रक्रिया अधिक क्लिष्ट होऊ शकते.

**अपील प्रक्रियेसाठी शुल्क**

प्रथम अपिलासाठी अगोदर शुल्क ₹२० होते ते आता थेट ₹५० आणि द्वितीय अपिलासाठी ₹१०० शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.एखाद्या विभागाने माहिती न दिल्यास नागरिकाला न्याय मिळविण्यासाठी अपील करावे लागते.अशा परिस्थितीत अतिरिक्त शुल्क आकारणे म्हणजे न्यायप्राप्तीचा मार्ग खर्चिक बनविणे असल्याची टीका होत आहे.

**विधिज्ञ प्रतिनिधित्वावर मर्यादा**

अपील प्रक्रियेत विधिज्ञ किंवा कायदेशीर प्रतिनिधींच्या सहभागावर निर्बंध घालण्याचा प्रयत्नही वादग्रस्त ठरला आहे.अनेक वेळा गुंतागुंतीच्या कायदेशीर बाबींमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शनाची गरज असते.त्यामुळे अशा मर्यादा नागरिकांच्या न्याय मिळविण्याच्या अधिकारावर परिणाम करू शकतात.

**सार्वजनिक चर्चा आणि हरकतींचा अभाव**

इतक्या महत्त्वाच्या नियमांबाबत राज्य शासनाने नागरिक,सामाजिक संस्था,माहिती अधिकार कार्यकर्ते आणि कायदेतज्ज्ञ यांच्याकडून सूचना व हरकती मागविणे अपेक्षित होते.यामुळे व्यापक सार्वजनिक चर्चा झाल्यास नियम अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख होऊ शकले असते.या प्रक्रियेचा अभाव हा देखील महत्त्वाचा आक्षेप मानला जात आहे.

**लोकाभिमुख नियमावलीची गरज**

माहितीचा अधिकार हा नागरिकांना शासनावर प्रश्न विचारण्याचे आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत माहिती मिळविण्याचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे कोणतेही नियम बनविताना माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ,स्वस्त आणि पारदर्शक होईल याची काळजी घेणे आवश्यक आहे.लोकशाही व्यवस्थेत माहितीचा अधिकार हा विशेषाधिकार नसून नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे नव्या नियमांवर व्यापक चर्चा करून आवश्यक ते बदल करणे ही काळाची गरज आहे.तसेच माहितीचा अधिकार हा केवळ एक कायदा नसून लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकता,उत्तरदायित्व आणि सुशासन सुनिश्चित करणारे प्रभावी साधन आहे.शासनाच्या कामकाजावर नागरिकांना देखरेख ठेवता यावी,सार्वजनिक निधीचा वापर कसा होत आहे याची माहिती मिळावी आणि भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ लागू करण्यात आला होता.मात्र महाराष्ट्र माहिती अधिकार नियम,२०२६ मधील काही नव्या तरतुदींमुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.विशेषतः माहिती मागताना त्या माहितीचे प्रयोजन सांगणे बंधनकारक करणे हे माहिती अधिकाराच्या मूळ तत्त्वांशी विसंगत वाटते.नागरिकांना माहिती का हवी आहे,याचा खुलासा करण्याची सक्ती केल्यास अनेक जण माहिती मागण्यापासून परावृत्त होऊ शकतात.तसेच अर्ज शुल्क,प्रतींचे वाढीव शुल्क,अपील शुल्क आणि इतर निर्बंध यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे.माहितीचा अधिकार हा नागरिकांचा हक्क आहे,तो मिळविण्यासाठी अनावश्यक अटी व निर्बंध लादणे योग्य ठरणार नाही.शासनाने नागरिक,माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक संस्था आणि कायदेतज्ज्ञ यांच्याशी व्यापक चर्चा करून या नियमांचा पुनर्विचार करावा.माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ,पारदर्शक आणि नागरिकाभिमुख ठेवणे हीच लोकशाहीच्या हिताची बाब ठरेल.

**- केतन भोज,घाटकोपर**
**विभाग संघटक-माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन,महाराष्ट्र**

